सादर करीत आहे

# जीवनाची

## सर्कस!

### येशू बरोबर जोखीम घेणे

## शिक्षकांचे पुस्तक

# जीवनाची सर्कस!

दररोज मोठ्या किंवा लहान प्रकारे, आपण सर्व उठतो आणि जे माहित नाही त्याच्या कडे जातो. आपल्या भिती आपल्याला 3 रिंग सर्कस प्रमाणे अचंबित करतात, आपल्याला लूळे ठेवण्यासाठी आणि आपले स्वप्न सोडून देण्यासाठी घाबरवितात.
परंतू देवाकडे आपल्यासाठी अद्भूत योजना आहे, जर आपण जीवन म्हटलेल्या ह्या सर्कस मध्ये येण्यासाठी आणि काही जोखीम घेण्यासाठी तयार आहोत तर.

जेव्हा येशू वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने आपल्याला सर्व प्रकारची जोखीम घेण्याचे सर्वोच्च उदाहरण दिले.

तुम्ही भितीला तुम्हाला थांबवू द्याल काय? की तुम्ही माझ्या बरोबर जीवन म्हटलेल्या ह्या सर्कस मध्ये धैर्याने प्रवेश कराल?

*''तू भिऊ नको, कारण मी तुझ्या बरोबर आहे; घाबरू नको, कारण मी तुझा देव आहे; मी तुला शक्ति देतो; मी तुझे सहाय्यहि करितो; मी आपल्या धार्मिकतेच्या उजव्या हाताने तुला सावरितो.''*
*यशया 41:10*

*क्रिस्टीना क्रॉस वाय स्टाफ एलएनसी*

Kristina Krause

Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत




# सर्व साधारण दृष्टिकोन

स्मृति चिन्हे | कालाबाजी

## ध्येय 1

**केवळ आनंदी असा!**
झावळयांचा रविवार, लूक 19:28-44
भितीः पूरेसे नसण्याची भिती




## ध्येय 2

**केवळ ते करा!**
पेत्र 3 वेळेस येशूला नकारतो, लूक 22:34, 54-62
भितीः अपयशाची किंवा चूकांची भिती






## ध्येय 3

केवळ तुम्ही स्वतः असा!
पिलाता समोर येशू देव असल्याचे स्वीकारतो,
लूक 23:1-4, 13-16
भितीः प्रामाणिक किंवा असुरक्षित असण्याची भिती.




## ध्येय 4

केवळ भरवसा ठेवा!
येशूचे वधस्तंभावरील मरण, लूक 23: 26-49
भितीः आजार किंवा दुःखाची भिती






## ध्येय 5

केवळ प्रिती करा!
येशु मृत्यू मधून जिवंत होतो!,
लूक 24:1-12, 36-42
भितीः नाकाराची भिती आणि एकटेपणा.





## केवळ ते करा
## लहान कलाकार


## पाठ करा

## कोडे



**पाठ करा**

**नीतिसूत्रे 15:13 " आनंदी मनाने मुख प्रसन्न होते; मनातील खेदाने हृदय भंग पावते."**







**पाठ करा**

**नीतिसूत्रे 30:5**


**“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे; त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो ढाल आहे."**






**पाठ करा**

**यशया 43:4 "तू माझ्या दृष्टीने अमोल आहेस; तू मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुझ्यावर प्रेम करतो, म्हणून तुझ्याबद्दल माणसे व तुझ्या जिवाबद्दल राष्ट्रे मी देईन."**






**पाठ करा**

**स्तोत्र 118:8**

**"मनुष्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा परमेश्वराला शरण जावे हे बरे."**






**पाठ करा**

**योहान 15:13**

**"आपल्या मित्रांकरता आपला प्राण द्यावा ह्यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही."**



# ह्या साहित्याचा उपयोग कसा करावा

## संचालक

संचालक ह्या नात्याने तुमचे मुख्य कार्य कार्यक्रम चालविणे आहे, ''जीवनाची सर्कस.'' सर्व कार्यक्रम व स्वयंसेवक आणि साहित्याचा समन्वय यामूळे कार्यक्रमात इतर कोणतेही कार्य करण्यासाठी तुम्हाला वेळ मिळणार नाही. स्वयंसेवक निवडा आणि तुमच्या मंडळीतील सभासदांना कार्यक्रमाचे वेळवेगळे भाग सोपवा. ह्यामूळे कार्यक्रमाबद्दल उत्साह वाढेल आणि मुलांपर्यंत पोहचण्यासाठी तुमच्या मंडळीतील सभासदांना मदत होईल.

## निवड करणे

तुमच्या मंडळीतील शक्य तितके लोक निवडा. ''जीवनाची सर्कस'' ह्या कार्यक्रमासाठी मोघम किंवा सामान्य मदत मागू नका, प्रत्येक व्यक्तिशी थेट बोला आणि विशिष्ट मदत मागा. कदाचीत तुमच्या मंडळीत असे कोणी असेल जे शिकविण्यासाठी घाबरेल, परंतू मुलांना हस्तकृतीत मदत करण्यासाठी आनंदी राहील.

- काही सूचविलेल्या भूमिका ह्या प्रकारे आहेत (10 + लोक):
- 2 किंवा 3 कलाकार नाटक विभागासाठी ''पडद्या मागे''.
- '' आनंदाच्या ठिणग्या'' भागात मुलांना कृती सह गिते शिकविण्यासाठी संगीत पुढारी
- सर्व मुलांबरोबर मुख्य धडा ''चला कार्यक्रम सुरू करू '' साठी शिक्षक (संचालक असू शकतो.)
- विद्यार्थी पुस्तकासाठी वर्ग स्थानक शिक्षक.
- मोठ्या विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करण्यासाठी शिक्षक
- ''स्मृती चिन्ह'' हस्तकृतीसाठी पुढारी
- खेळाचा पुढारी ''कलाबाजी'', ''लहान कलाकार'', ''केवळ ते करा'', अधिक लोकांसह, लहान मुलांबरोबर मदत करण्यासाठी तुम्ही एक किंवा अधिक कामकरी ठेवू शकता, दृकश्राव्य यंत्रे चालविण्यासाठी, संगीत शिकविण्यासाठी किंवा प्रत्येक स्थानकावर मदतनीस अशा प्रकारे.

## प्रशिक्षण

कार्यक्रमात सहभागी झालेल्यांसाठी हा भाग फार महत्वाचा आहे, वेळेला प्राधान्य देणे लक्षात ठेवा, पूर्ण वेळ कर्मचारी आणि स्वयंसेवक व्यस्त आहेत म्हणून, साधी परंतू परिणामकारक योजना, तारीख विकसित करा, ऑनलाइन प्रशिक्षण ''जीवनाची सर्कस'' ह्यात भाग घेण्यासाठी आणि कार्य व साधनसामग्री पोहचविण्यासाठी. तुम्हाला मदत करण्यासाठी आणि त्यांना पवित्र शास्त्राच्या ज्ञानात प्रशिक्षित करण्यासाठी, शिकविण्याच्या अनुभवासाठी आणि त्यांना ह्या सुंदर सेवेमध्ये परिपूर्ण होण्यासाठी कौशल्ये देण्यास योजना यादी पाहण्यास विसरू नका.

## आमंत्रण व नोंदणी

इस्टरच्या वेळेसचा कार्यक्रम सुवार्ता प्रसार करण्यासाठी एक उत्तम संधी आहे. कल्पना करा की एके दिवशी तुम्ही कोणाला तरी भेटता जो तुम्हाला सांगतो की तुमच्या इस्टरच्या कार्यक्रमामूळे ते येशूला अनुसरत आहे! तुमच्या कार्यक्रम मंडळीतील लहान मुलांपर्यंत सिमीत ठेवू नका. जाहिरात साहित्य तयार करा आणि मुलांना त्यांच्या वर्गमित्रांना आमंत्रित करायला सांगा आणि ज्या मुलांचे मित्र इस्टरच्या कार्यक्रमाला येतील त्यांना बक्षीस देवू करा. जर तुम्ही तुमच्या कार्यक्रमासाठी छोटीशी फी घेत आहात तर, पालकांना त्यांच्या मुलांच्या मित्रांसाठी शिष्यवृत्ती द्यायला सांगा जेणे करून ते देखील येशूला भेटू शकतील. वेळे आधी रजिस्टर तयार करा हा हिशोब लावण्यसाठी की तुमच्या इस्टरच्या कार्यक्रमाला ''जीवनाची सर्कस'' साठी किती मुलं हजर राहतील जेणेकरून तुम्ही आवश्यक ते साहित्य गोळा करू शकाल.

## वेळापत्रक

ते सर्व 5 दिवसासाठी सारखेच आहे, केवळ हे लक्षात घ्या की कृती वेगवेगळी असेल. गरजेनुसार वेळापत्रक समायोजित करण्याची मुभा घ्या. सर्व मुलं एकत्रित असतांना दिवसाची सुरवात करा.

प्रार्थना

- आनंदाच्या ठिणग्या/ चालना देणारी कृती
- पडद्या मागे (नाटक)
- कार्यक्रम सुरू होतो (विषयाची ओळख करून द्या)
- आम्ही सल्ला देतो की पडद्यामागे: (नाटक)आणि ''कार्यक्रम सुरू होतो'' (मुख्य धडा) ह्या दोघांच्या मध्ये तुम्ही कृतीसह चीयर करा, जेणे करून मुलांना हालण्याची सुधी मिळेल. मग तुम्ही मुलांना विभागांसाठी गटात विभागू शकता.
- स्मृती चिन्ह किंवा हस्तकृती
- विद्यार्थी पुस्तकांसह वर्ग

त्यानंतर मुलं एकत्रित समारोप कृतीत भाग घेऊ शकतात:

- हे स्वत: करून पहा/ लहान कलाकार
- गीते (ऐच्छिक)
- कलाबाजी (खेळ)

पटकण धडयाची उजळणी व प्रार्थनेसह दिवसाचा समारोप करा.

## स्थानकं

'' भ्रमण स्थानकं'' तुमच्या ''जीवनाची सर्कस'' ह्या कार्यक्रमाला व्यावसथापित करण्याचा मार्ग आहे जेणे करून तुम्हाला डिंक, पेन्सील इ. सारखे साहित्य ज्यास्त लागणार नाहीत आणि म्हणून सर्व मुलांना एकाच वेळेस हस्तकृती करावी लागणार नाही. मुलांना तीन किंवा अधिक गटात विभागा आणि सल्ला द्या की ते कृतीची अदाबदली करतील. उदा. प्रगत आणि कठिण वर्गाला मध्यम वर्ग ''पडद्यामागे'' स्थानकावर असतांना त्यांचे विद्यार्थी पुस्तक वापरू द्या आणि सोपा वर्ग त्या वेळेस ''स्मृती चिन्ह'' तयार करेल प्रत्येक  स्थानक 15-20 मिनिटांसाठी तयार केलेला आहे. संचालक किंवा ज्याला स्थानकांवर देखरेख करण्याची जबावदारी दिली आहे ते वेळेवर नियंत्रण ठेवतील आणि बदलण्याच्या वेळेस घोषणा करतील. बदल करण्याचा संकेत देण्यासाठी तुम्ही एखाद्या गायनाचा उपयोग करू शकता. जर जागा  मुभा देत असेल तर एका जागेवर सारखी कृती घ्या आणि मुलांना निर्देशानुसार बदलू द्या. ह्या मुळे मुलांना उभं राहून हालण्याची संधी मिळते. जर पूरेशी जागा नसेल तर, मुलांना एकाच जागेवर ठेवा, परंतू ते करत असलेली कृती बदला. त्यांना उठू द्या आणि विस्तारीत होऊ द्या किंवा कृतींच्या मध्ये जागा बदलू द्या आणि त्यांना हलण्याची संधी द्या.

## कार्यक्रम सुरू होतो (वर्ग)

ह्या भागात विद्यार्थ्यांसाठी जीवनासाठी संदेशाबरोबर मुख्य धडा दिला जाईल.

## विद्यार्थी पुस्तकं

कोडे

ह्या स्थानकावर मुलांना त्यांच्या विद्यार्थी पुस्तकामध्ये कोडे सोडविण्यात आनंद प्राप्त होईल. आपले पुस्तकं खालील वयोगटासाठी तयार करण्यात आले आहेत.

सोपे -4-6 वर्ष
मध्यम -7-9 वर्ष
कठिण - 10-12 वर्ष
प्रगत -13 + वर्ष

## चर्चा  प्रश्न

मुलं मोठे झाल्यावर, ते जीवनाची क्लीष्टता पाहणे सुरू करतात अणि पवित्र शास्त्रातील गोष्टीमधून ते जे शिकले त्याचे लागूकरण त्यांच्या जीवनात करण्यासाठी त्यांना कठिण वाटू शकते. ह्या कारणामूळे आपण प्रश्न व उत्तर भाग देतो जेणे करून मोठ्या  मुलांना त्यातील काही प्रश्नाद्वारे मार्गदर्शन केले जाईल आणि धडा त्यांच्यासाठी वास्तव केला जाईल. नमूना उत्तरं लगेच दिले जाऊ नये, मुलांना स्वत: विचार करू द्या जेणे करून ते जे शिकले ते ते अधिक चांगल्या प्रकारे लक्षात ठेवू शकतील. कधी कधी उत्तर दिलेच जात नाही. त्यांच्या चर्चेचे मार्गदर्शन करणे अधिक चांगले आहे जेणे करून ते स्वत:च्या निष्कर्षा पर्यंत पोहचू शकतील. त्यांना आज जीवनाचे लागूकरण ह्याबद्दल विचार करण्यासाठी प्रोत्साहित करा, केवळ ऐतिहासिक पवित्र शास्त्रावर आधारित वास्तविकतेवर नाही. तुमच्या वर्गात विश्वासाचे वातावरण विकसित करा जेणे करून तुमचे  विद्यार्थी चूक होण्याच्या भिती शिवाय त्यांचे मन व्यक्त करण्यासाठी सुरक्षित अनुभव करतील. जर ते वयैक्तिक रित्या व प्रमाणिक पणे प्रश्नांची उत्तरं देतील तर ते वाढतील आणि परिपक्व होतील.
ह्या कार्यक्रमात आपण प्रत्येक वयोगटाच्या विद्यार्थ्यांना काही चालणादेणा-या कृती विकसित केल्या आहेत. त्यात तर्कशुध्द, क्रमवार आणि विश्लेषणात्मक चालाना देणा-या कृती आहेत. आम्ही सल्ला देतो की तुम्ही हा कार्यक्रम सुरू करण्याआधी त्याचा अभ्यास करावा.

## आनंदाच्या ठिणग्या

मुलं सर्व प्रकारच्या प्रेरणांचा अद्भूत रित्या स्वीकार करता, आणि संगीत त्यातील एक सामर्थ्यशाली प्रेरणा आहे. अशाप्रकारे संगीताचा जर योग्य रित्या वापर केला तर तो त्यांच्यावर आश्चर्यकारक रित्या सकारात्मक प्रभाव पाडेल. त्याचा उपयोग बंधणकारक असा करणे टाळा आणि प्रत्येक क्षणासाठी योग्य प्रकार कसा निवडावा हे शिका. ह्या मूळे भावनात्मक सुरक्षा पूरविली जाते, शिक्षण मजबूत होते, लक्ष केंद्रित  होण्यास मदत होते आणि शरीरिक अभिव्यतीची परवांगी मिळते.

## पडद्या मागे (नाटक/रेखाटन)

नाटक त्या दिवसाच्या धडयाची प्रस्तावना करण्यासाठी लिहिले गेले आहेत, नक्कीच नाटक पाहणे मजेदार आहे आणि ते आपल्याला विचार करायला लावते. जेव्हा मुले हसतात किंवा रेखाटनाचे विचार करतात तेव्हा ते शिकतच आहेत! तुमच्या नाटकांसाठी सोबत साहित्य असणे चांगले आहे जेणे करून मुलांच्या कल्पनेला चालणा मिळेल.
हे लक्षात घ्या की मुलांच्या लक्ष देण्याची वेळ 8 मिनिट आहे, त्यांच्या वयावर आधारित (अंदाजे दर वर्षाला 1 मिनिट) ह्या वेळेत नाटक संपवा आणि ते दर आठवडयात नाटकांची वाट पाहतील. आणि मजा करणे विसरू नका!

## स्मृती चिन्ह (हस्तकृती)

मुलांना चित्र काढायला मिळेल आणि नविन गोष्टी बांधायला मिळतील म्हणून मुलं हस्तकुतीच्या वेळेस आनंद घेतील. प्रत्येक हस्तकृती लहान व मोठ्या मुलांसाठी तयार केलेली आहे; प्रत्येकजण त्याचा वापर करू शकेल आणि ते करण्यासाठी व त्याला वयैक्तिक स्पर्श देण्यासाठी आनंदी राहील.

## कलाबाजी (खेळ)

खेळांशिवाय कार्यक्रम पूर्ण होणार नाही! ह्या भागात तुम्ही उत्तम खेळ पहाल, जिथे मुलं उत्साहित होतील आणि भरपूर मजा करतील. खेळांचा सराव करणे तुमच्यासाठी खूपच सोपे जाईल. आवश्यक असलेल्या वस्तू साध्या, स्वस्त, आणि मिळण्यास सोप्या आहेत. ''जीवनाची सर्कस'' ह्या अद्भूत कार्यक्रमातील ह्या अद्भूत अनुभवाचा ते आनंद घेतील.

## हे स्वतः करून पहा

ह्या सुंदर कार्यक्रमात युक्त्या असल्याच पाहिजे. ''ते स्वत: करून पहा'' ह्या भागात मुलं मजा करू शकतात आणि आश्चर्य चकित होऊ शकतात. विशेषत: शिक्षकांसाठी निर्देशित केलेले असता, त्यांना साध्या परंतू परिणाम कारक युक्त्यांचा उपयोग करून वातावरण उत्साहित करण्याची संधी आहे. ह्या भागात दिसणारा भ्रम आवश्यक राहिल, जिथे ते ह्या मजेदार आणि अत्यंत आश्चर्यकारक सादरीकरणाद्वारे त्यांच्या प्रेक्षकांचे लक्ष वेधतील. केवळ ह्या गोष्टीची खात्री करा की तुम्ही प्रत्येक पर्याय सादर करण्याआधी त्याचा सराव करावा.

## लहान कलाकार

**हा तो विभाग आहे जिथे मुले त्यांची कौशल्य प्रत्यक्षात उतरवितात. ही उत्तम संधी आहे, नविन कौशल्य शिकण्याची जे त्यांच्यात आहेत हे त्यांना माहित सुध्दा नसते. ''लहान कलाकार'' मुलांच्या आवडीच्या दोन गोष्टींचा उपयोग करतात, खेळ आणि कल्पना-- शिकण्याच्या प्रक्रियेचे दोन महत्वाचे स्तंभ. आणखी ह्या भागात मुलं हे शिकतील की एखाद्या कृतीच्या नियमांचे पालन करून जे प्रस्तावित उद्दिष्ट आहेत ते प्राप्त करता येतात. लहान कलाकार ही सहानुभूती दाखविण्यासाठी आणि संघ म्हणून एकत्र काम करण्यासाठी उत्तम संधी आहे जेणे करून मजेच्या लहान स्पर्शाने तुमचे हातकौशल्य बळकट होईल.**

## गृहपाठ

**मुलांना व पालकांना दिवसभरात ते जे शिकले ह्याची घरी उजळणी करण्यासाठी प्रोत्साहित करणे ही आपली इच्छा आहे, म्हणून आम्ही सल्ला देतो की त्यांनी घरी जी चर्चा केली त्या बद्दल आळीपाळीने सांगावे.**

**हा सराव, आपुलकीचे बंधनं मजबूत करण्यासोबत, त्यांना स्वत:ला व्यक्त करण्याचे मार्ग सुधारण्याची संधी देईल.**

# 1 केवळ आनंदी असा!

### भिती: पूरेसे नसण्याची भिती

## सुरवातीची कृती

### *पवित्र शास्त्रातील पात्र*

ज्या मुलांनी सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेत भाग घेतला आहे त्यांनी पवित्र शास्त्राबद्दल अनेक गोष्टी ऐकल्या आहेत. एक कल्पना ही आहे की पवित्र शास्त्रातील पात्रांबरोबर उखाणे खेळावे; एक मुल पात्राचा अभिनय करतो आणि इतर ओळखतात. तुम्ही नविन पात्र निवडल्या नंतर, वेळ संपेपर्यंत खेळत रहा. आणखी एक प्रकार हा आहे की मुलं येतात तेव्हा त्यांच्या पाठीवर पवित्र शास्त्रातील पात्रांचे नाव असलेले कार्ड लावावे.

मुलांनी त्यांची ओळख न सांगता ते कार्ड वाचावे. प्रत्येक मुलाने ''होय किंवा नाही'' हा प्रश्न विचारावा हे ओळखण्यासाठी की त्यांच्या पाठीवर कोणते पात्र आहे.

## पडद्या मागे

विदूषक जादूच्या युक्त्या करतो आणि नंतर त्याच्या मित्राकडे कडक दोरीवर चालणारा ह्या कडे रडतो. तो सांगतो की त्याला वाटते की तो पूरेसा नाही आणि त्याला कसेतरी करून लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि चांगला दिवस असण्यासाठी कार्यक्रम करावा लागतो. सिंह प्रशिक्षक जवळून जातो आणि विदूषक त्याला पाहतो आणि विचार करतो की तो कोण आहे.

## कार्यक्रम सुरू होतो

**झावळयांचा रविवार लूक 19:28-44**

**-पूरेसे नसण्याची भिती-**

असमाधान आपल्यातील अनेकांना ग्रासते. कधी कधी आपल्याला भिती वाटते की आपल्याकडे पूरेसे अन्न राहणार नाही आणि आपण उपाशी राहण्या बद्दल काळजी करतो. कदाचीत आपण होटेल मध्ये सुंदर जेवणासाठी आतुर असतो किंवा आपले पोट दुखते की आपल्याला काल 2 वेळेचे जेवण सुध्दा मिळाले नाही. इतर वेळेस सोशल मिडियावर आधारित आल्याकडे पूरेसे नसण्याची भावना असते. आपण इतर लोकांचे फेसबुक किंवा इन्स्टाग्राम खाती पाहतो, आणि आपण त्यांची समुद्रकिना-यावरील हसणारे चेहरे पाहतो आणि त्यांचे कुटुंब खूप आनंदी दिसते. त्यांच्या मंडळीचे छायाचित्रे आपल्या मंडळीपेक्षा चांगले दिसतात. आपण विचार करतो की व्हाटस्ॲपवर दिसणा-या छायाचित्रासारखे आपले कुटुंब कधीच आनंदी नसते. कदाचित आपण शाळेला जाण्यासंबंधी आणि योग्य कपडे नसण्यासंबंधी घाबरतो. कधी कधी आपली भिती वस्तूंवर आधारित असते, परंतू आपण आपल्या शाळेतील मित्रांसंबंधी असमाधानी असतो. आपण इच्छा करतो की आपण अधिक प्रसिध्द असायला हवे होते. आज ज्या विदूषकाला आपण भेटलो त्याला तसेच वाटले, की लोकांना आनंदी ठेवण्यासाठी जादूच्या युक्त्यासह चांगला कार्यक्रम करणे. त्याला त्याच्या युक्त्यांनी लोकांचे मनोरंजन करण्यासंबंधी दबाव वाटला. आपला स्वत:चा आनंद कधी कधी खूप दूर असल्यासारखा वाटतो, परंतू तो आपल्याला वाटतो त्यापेक्षा दूर नाही. ''केवळ आनंदी असणे!'' खरंच शक्य आहे.

देवाची इच्छा आहे की आपल्याकडे जे आहे त्यात आपण आनंदी असावे. ज्या भितीचा अनुभव आपण करतो त्याचा अनुभव येशूने सुध्दा केला जेव्हा तो ह्या पृथ्वीवर होता. त्याच्या शिष्यांबरोबर 3 वर्ष घालविल्यानंतर येशूला माहित होते की केवळ एका आठवडयात त्याला आपल्या सर्वांसाठी अंतिम बलिदान द्यायचे आहे. हे तेव्हा होते जेव्हा त्याने आपल्या वाईट वागणूकीसाठी शिक्षा भोगली. पृथ्वी वरील शेवटच्या आठवडयाच्या सुरवातीला, त्याने यरूशलेममध्ये प्रवेश केला, हे जाणत की त्याच्या पुढे कोणते दु:ख आहे. शिष्यांना वाटत होते की त्याने मोठ्या घोड्या वर यरूशलेम मध्ये प्रवेश करावा, त्याच्या बाजूला मोठ्या सैन्यासह, यहूदयांचा नविन राजा म्हणून ताबा घ्यावा. त्याच्या आजूबाजूच्या सर्वांकडून येशूला दबावाचा अनुभव झाला असेल.

ख-या राजाकडे गौरवी फेसबुक पान असतं, राजेशाही झगा जो त्याच्या गौरवी राजशाही घोड्या ला व रथाला झाकत होता. परंतू मोठ्या  घोड्या वर मोठ्या प्रदशद्यनासह येण्या एवजी तो एका गाढवावर बसून येरूशलेममध्ये आला! ते शहरामध्ये एका लहान जनावरावर बसून आला आणि सैन्या शिवाय. परंतू लोकांनी तरीही त्याला प्रदर्शनकर्ते दिले, जैतूनाचे पानं किंवा त्यांचे झगे रस्त्यावर त्याच्यासमोर टाकून. तो यरूशलेममध्ये प्रवेश करत असतांना ते जयघोष करीत होते. त्याला माहित होते की तो मोठा उत्सव होता परंतू लोक ते पाहू शकत नव्हते. ते हे पाहू शकत नव्हते की तो खरं तर त्यांचे तारण करण्यासाठी आला आहे आणि त्यांनी जीवनात खरा आनंद व समाधान अनुभवावा म्हणून आला आहे.

विदूषक चमत्कारीक युक्त्या करून मोठा कार्यक्रम करू शकतो, परंतू तो लोकांना हसवू शकत नाही. तो त्यांना केवळ हसण्याची संधी देवू शकतो. देव आपल्याला हसण्याची आणि आपल्या जीवनात समाधानी असण्याची संधीही देत आहे जर आपण आज जोखीम घेतली तर. आज तुम्ही तुमच्या जीवनाची इतरांशी तुलना करणे थांबवून आनंदाचा स्वीकार कराल काय?  जे तुमच्या कडे नाही त्याची भिती दूर करून जे तुमच्या कडे आहे त्याचा आनंद तुम्ही घ्याल काय? आपल्यातील कोणाचेच जीवन परिपूर्ण नाही. परंतू जे जीवन आपल्याकडे आहे त्यात आपण ‘‘केवळ आनंदी’’ असू शकतो.

## पाठ करा

**नीतिसूत्रे 15:13 " आनंदी मनाने मुख प्रसन्न होते; मनातील खेदाने हृदय भंग पावते."**

## स्मृती चिन्हे

### *देखावा*

**साहित्य**

- मंचाचा नमूना

(प्रत्येक मुलासाठी 1)

- रंग कांड्या किंवा रंग
- डिंक किंवा टेप
- कैची




**सूचना:**

1. नमून्याचा प्रत्येक भाग वेगळा करा किंवा कापा
2. नमून्याच्या भागांना रंग भरा.
3. बिंदू रेषेवर चिन्हांचा पाया दुमडा.
4. त्यांना अधिक मजबूत करण्यासाठी एकत्र चिटकवा
5. त्यांना मंचावर विभागा.
6. सर्व पात्रांबरोबर मंचावर

नमूना कागद विषयाच्या शेवटी आहे.

## आता तुम्ही करून पहा

सर्कस मध्ये कार्यक्रमातील एक भाग जो लक्ष वेधीत करतो तो म्हणून जेव्हा युक्त्या केल्याजातात. संशय न धरता काही प्रसंगी जे लोक हे कार्य करतात त्यांच्या कौशल्यांनी तुम्ही आश्चर्य चकित झाला आहात.

ह्या कार्यक्रमात आमची इच्छा आहे की तुम्ही ती व्यक्ति बनावे जी ह्या कार्यक्रमात भाग घेणा-यांना आश्चर्यचकित करेल. म्हणून ज्या युक्त्यांचा सल्ला आम्ही इथे देत आहोत त्याचा तुम्ही सराव करावा, त्यांना परिस्थितीनुसार बदलण्याची किंवा काही वेगळे करण्याची तुम्हाला मोकळीक आहे.


## *चुंबकी पेन्सील*



तुमच्या हातात चुंबकीय शक्ति आहे असा विश्वास ठेवायला लावून मुलांवर छाप टाका. सुरवातीची युक्ति ही आहे की तुम्ही श्रोत्यांना तुमच्या हाताची मागील बाजू दाखवावी आणि दुस-या हाताच्या पहिल्या बोटाने तुम्ही पेन्सिल धरून ठेवावी, इशा प्रकारे की तुमच्या हाताचे बोटं घट्ट धरावे त्यांचा हा विश्वास पटण्यासाठी की तुम्ही स्वत: खूप थकत आहात.


युक्तीचा दुसरा भाग हा आहे की तुम्ही लाकडाचा तुकडा तुमच्या घडयाळीच्या पट्ट्यामध्ये टाकावा आणि पेन्सिल पकडावी की ती पडू नये.





# कलाबाजी

## *ढिली रश्शी*



*साहित्य:*

- टेन, प्लास्टिक, किंवा चॉक
- घडयाळ किंवा टायमर

सूचना:

- 5 मिटर लांबीची रेषा आखा
- गटाला समान असे विभागा
- मुलांनी आखलेल्या रेषेवर ती न सोडता एका पायावर मागे व पुढे असे उडया मारायच्या आहेत; जो कोणी रेषा चुकवितो तो सुरवात बिंदूकडे परत येतो.
- प्रत्येक मुलाकडे ते करण्यासाठी तीन संधी आहेत. जर तो तिस-यांदा चूकतो तर तो रेषेच्या शेवटी परत येतो आणि वेळत 10 सेकंद जोडले जातात.
- ज्या संघातील सर्व खेळाडू सर्वात कमी वेळात ते पूर्ण करतील तो संघ जिंकेल.

*मोठ्या  मुलांसाठी, हा बदल केला जातो. एक लहान चक्रव्यूह काढा. प्रत्येक भाग घेणा-याच्या डोळ्याला पट्टी बांधली जाते आणि त्याला त्याच्या संघाने चक्रव्यूहातून योग्य प्रकारे जाण्यास मार्गदर्शन करावे.*

## घरी

### *लहान थेटर*



मूलं जे काही दिवसभर शिकले त्याची घरी उजळणी करावी म्हणून आहे.
पण मुलांना व त्यांच्या पालकांना प्रोत्साहित करू इच्छितो, म्हणून आम्ही सल्ला देतो की कुटुंब ह्या नात्याने त्यांनी सांगण्यासाठी काही मिनिटं घ्यावी.

### *साहित्यः*

*सिरियलचा रिकामा डबा*

- *रंगीत कागद*
- *कैची आणि डिंक किंवा टेप*




*सूचनाः*


- *डबा सर्वात रूंद बाजूने कापला जातो, मंचासाठी जागा सोडण्यास*
- *आवडीनुसार त्याला रंगीत कागदाने सजवा*
- *कागदाच्या मदतीने, 2 चरित्र तयार करा बोटांचे पपेट किंवा काडयांवर वापरण्यासाठी*


*कल्पना ही आहे की जी गोष्ट ते दिवसा शिकले ती पुन्हा तयार करावे जेणे करून कुटुंब चरित्रात सुधारणा करू शकतील.*

# विद्यार्थी पुस्तकं

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | प | ग | त | त्का | क्षी | ने | ना | ने | प | स | प्र | व | रे | सा |
| स | ने | त | ल | वि | ग | उ | प | चा | र | वि | ढ | कृ | त | क्षी |
| ग | क्षी | ळ | क्रा | उ | ल | रे | र | ल | ने | ग | त | क्षी | प्र | द |
| वि | ग | हा | वे | र | क्षी | ग | उ | सं | च | वे | वि | ना | प | र |
| श्वा | प | ता | ना | ग | सं | ना | सं | त | प्र | म | ना | ल | रे | सं |
| स | रे | ची | प | क्षी | वे | प | स | वि | ने | ल | त्का | ने | उ | त्का |
| रे | ल | पा | वि | प्र | त | त्का | ती | उ | पु | ग | प्र | र | उ | वि |
| त | क्षी | ने | त्का | उ | वि | प्र | ना | रे | रे | त्का | त | प्र | ग्री | ग |
| उ | वे | रे | ष | ल | स | ने | रे | प्र | सा | प्र | स | म | वे | ने |
| ल | वि | तो | ने | तु | ल | ना | क | रा | प्र | सं | सा | त | क्षी | प्र |
| रे | सं | प्र | रे | स | त्का | उ | ना | स | त | ल | उ | ग | त | वे |
| अ | ल | उ | ल | ग | वि | ग | ल | सं | स्तु | ती | ने | वि | त | श |







## प्रश्न व उत्तरं

**1. देवाने जे केले त्या बद्दल तुम्हाला कधी असमाधानी वाटले काय?**

**होय, उदा. बरेचदा आपल्याकडे जे आहे त्याबद्दल आपण समाधानी नसतो, आणि आपला विश्वास कमी होतो. परंतू जेव्हा आपण हे समजतो की देवाची योजना परिपूर्ण आहे, तेव्हा अशा गोष्टी आहे की त्या आपल्याला लोक म्हणून समजणार नाही. आपण देवाला आपल्या बरोबर कार्य करू देऊ शकतो आणि मग आपल्या जीवनातील सर्व बारकाईंचा आनंद घेवू शकतो. यशया 55:9**

**2.- तुम्ही एखाद्या कठिण प्रसंगासाठी देवाकडे तक्रार केली काय?**

**होय, कधी कधी आपण जे घडत आहे त्या बद्दल केवळ असमाधानी आहोत असे नाही तर आपण देवाकडे तक्रार सुध्दा करतो. अशा परिस्थितीत आपले निर्णय आणि आपली वागणूक ह्या बद्दल बरच काही असते, परंतू आपल्या जीवनातील सर्वात कठिण क्षणांमध्ये देव आपल्याला अलिंगण देतो. आपण हे शिकतो की तो आपल्याला शांती आणि समाधान देऊ शकतो. रोम 5:1**

**3.- जर येशू तुमच्या बाजूने गेला आणि जर तुम्ही त्याने केलेला चमत्कार पाहिला , जसे त्याने कोविड-19 पासून किंवा इतर आजारांपासून लोकांना बरे केले तर तुमची प्रतिक्रिया काय असेल?**


**कदाचित सुरवातीला,लोकां मध्ये देवाचे चमत्कार पाहून आपल्याला खूप भावनांचा अनुभव येईल, किंवा कदाचित आपण घाबरून जाऊ किंवा केवळ शांत राहू. कोणत्याही परिस्थितीत, आपण त्याला अनुसरणे शिकू शकतो आणि येशू जे सर्व करतो किंवा आपल्यासाठी जे काही करू शकतो त्याची साक्ष देणारे बनू शकतो. मत्तय 16:24**


स्मृती चिन्हे




















नमुना कागद

# 2 केवळ हे करा!

भितीः अपयशाची किंवा चूकांची भिती.

## सुरवातीची कृती

*एकत्र व्हा आणि भेटा*

वेगवेगळया रंगाचे कंचे, लाकडाचे तुकडे किंवा कागदं तयार करा

प्रत्येक मुलाला त्यातील भरपूर घेवू द्या (किंवा जे तुमच्या कडे उपलब्ध आहे ते.) प्रत्येक रंगाला वेगळा अर्थ द्या

निळाः कुटुंब.
हिरवाः शाळा.
पिवळा: मित्र.
लालः छंद.
कथ्थाः संगीत/चित्रपट.

त्यांच्या हातामध्ये जितक्या वस्तू आहेत त्या ठरवतील की त्यांना किती परिस्थिती मोजायच्या आहेत. उदा. जर त्यांच्या कडे दोन पिवळे आहेत तर, त्यांना मित्रांना दोन वास्तविकता सांगयच्या आहेत.

## पडद्या मागे.

विदूषक त्याचा मित्र कडक दोरीवर चालणारा ह्याच्या कडून धडे घेता. तो दोरीवर पाय ठेवणे शिकतो परंतू प्रत्येक वेळेस तो खूप घाबरतो. त्याला भिती वाटते की तो दोरीवरून खाली पडेल, आणि म्हणून तो प्रयत्न करण्यास तयार नाही. त्याचा मित्र त्याला खात्री पटविण्याचा प्रयत्न करतो की त्याच्या खालची दोरी त्याला पकडेल परंतू विदूषक दोरीच्या पलीकडे गेल्यास ज्या भयंकर आणि अवाजती गोष्टी सांगतो ज्या त्याच्या बरोबर घडू शकतात. त्याची भिती त्याला प्रयत्न करण्यापासून देखील थांबवेल काय? सिंह प्रशिक्षक पुन्हा बाजूने जातो आणि विदूषक म्हणतो की जर तो त्याचा मित्र झाला तर किती बरे होईल.

## कार्यक्रम सुरू करा!

**पेत्र 3 वेळेस येशूचा नाकार करतो, लूक 22:34,54-62**

**-अपयशाची किंवा चूकांची भिती-**

दररोज आपण काहीतरी करून पाहण्याची किंवा चूकण्याच्या भितीचा सामना करतो. आपल्याला चूका करण्याची भिती वाटते. लोक काय म्हणतील? आपण खाली पडू आणि आपल्या तोंडावर माती लागेल काय? कधी कधी आपण ह्या भितीवर विजय मिळवून पुढे जाऊन काही तरी नवीन करून पाहू शकतो! आपल्याला खरं तर मजा वाटू शकते आणि आपण त्यात चांगले आहोत असे लक्षात येऊ शकते! किंवा आपण त्यात चांगले नसू शकतो आणि थांबण्याचा निर्णय घेवू शकतो. परंतू जेव्हा अपयाशाची भिती आपल्याला गोष्टी करून पाहण्यापासून देखील थांबविते तेव्हा जीवनातील आपले पर्याय खूप कमी हातात.

हे आपला मित्र विदूषक ह्याच्या सारखेच आहे जो दोरी पाय ठेवून पाहण्यासाठी सुध्दा तयार नाही. त्याला काहीच माहित नाही की तो ते करण्यात चांगला आहे की नाही. तो ‘‘केवळ ते करून पाहण्यासाठी’’ तयार नव्हता.
येशू आपल्याला प्रोत्साहन देतो की आपण बाहेर पडावे आणि प्रयत्न करावा. त्याने एका दिवशी पेत्राला बोटीतून बाहेर यायला लावले आणि चक्क पाण्यावर चालायला लावले! पेत्राने तसा प्रयत्न केला परंतू तो अपयशी झाला आणि पाण्यात बुडला. परंतू काळजी करू नका तो बुडला नाही, येशूने त्याला वाचविले. येशू आनंदी होता की त्याचा एक शिष्य बोटीतून बाहेर येण्यासाठी तयार होता. आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टी मध्ये, पेत्र पुन्हा त्याची भिती बाजूला सारून प्रयत्न करून पाहण्यासाठी तयार आहे.

तो शेवटच्या भोजनाच्या वेळेस येशूला म्हणाला, ‘‘प्रभू मी तुझ्या बरोबर तुरूगात जाण्यासाठी आणि मरण्यासाठीही तयार आहे!’’ पेत्राला वाटले की तो बराच शूर बनू शकतो.

येशूला माहित होते की ह्या वेळेस पेत्र आपयशी होणार आहे आणि चूक करणार आहे. ह्या वेळेस पेत्र शूर होण्या ऐवजी असे दाखविणार आहे की तो येशूला ओळखत सुध्दा नाही. येशूने पेत्राला म्हटले,‘‘आज कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीनदा नाकारशील’’. परंतू येशूला हे देखील माहित होते की भविष्यात पेत्र धैर्यवान होईल आणि ज्या गोष्टीवर तो विश्वासा ठेवतो त्याच्यासाठी उभा राहिल!
येशूला अटक झाल्यावर, पेत्र दुरून त्याच्या मागे जात होता हे पाहण्यासाठी की काय होत आहे. जिथे इतर लोक गोळा होऊन येशू बद्दल बोलत होते तिथे तो शेकोटीजवळ बसला. एका दासीने पेत्राला पाहिले आणि म्हणाली, ‘‘तू देखील त्यांच्यातलाच आहेस!’’ हे सांगत की तिने पेत्राला येशूबरोबर पाहिले होते. पेत्र म्हणाला,‘‘ मी त्याला ओळखत नाही!’’ ( हे खोटे होते) पेत्राने 3 दा येशूला नाकारल्यानंतर कोंबडा ओरडला.
जरी पेत्राने ह्या वेळेस चूक केली होती तरी हे चांगले आहे की पेत्राने प्रयत्न करणे सुरू ठेवले. कधी कधी तो खूप धैर्यावान होतो आणि त्याने येशूसाठी अनेक लोक जिंकले. पेत्र खंबीर शिष्य आणि पहिल्या मंडळीतील पुढारी बनला. जर पेत्र आजच्या विदूषकासारखा प्रयत्न करण्यासाठी सुध्दा तयार झाला नसता तर हे कधीच घडले नसते. तुमच्या आणि माझ्या साठी नवीन गोष्टी करण्याचा प्रयत्न करणे कठिण आणि कारण बरेचदा आपण अपयशाची भिती बाळगतो. कोणी आपल्या चूकीवर हसू नये असे आपल्याला वाटते. परंतू ह्या मूळे आपले जीवन कंटाळवाणे व एकटे होते. आपण बाहेर निघून नविन गोष्टी केल्या पाहिजे, जरी आपण सर्व गोष्टीत चांगले नसलो तरी आणि कधी कधी पेत्रा प्रमाणे आपण चूका देखील करू तरी. अपयशाच्या तुमच्या भिती कडे दुर्लक्ष करून ते ‘‘तुम्ही ते करणार’’ काय?

## पाठ करा

**नीतिसूत्रे 30:5 “ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे; त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो ढाल आहे."**

## कलाबाजी

***अडखळण: गोल***

*साहित्य:*

- एक गोल
- ऐच्छिक: गोलासाठी सजावट जे असा भास दाखविते की ते जळत आहे.

सूचना:

- मुलांना एका रांगेत उभे राहून एका वेळेस गोलातून उडी मारू द्या
- सर्व प्रथम गोल जमीनवर उभा ठेवा
- प्रत्येक फेरीत गोल थोडा वर घ्या
- प्रत्येक प्राप्त केलेल्या स्तरावर त्यांना अंक मिळतात



मोठ्या मुलांसाठी बदल हा आहे की गोलातून जखमी होऊ नये ह्याची काळजी घेत जातांना त्यांनी कुलांटी मारावी.

## आता तुम्ही करून पहा

*शर्ट बदला*

सभोवार चालत असतांना, सर्वांसमोर तुमचे शर्ट बदला. युक्ती ही आहे की तीन शर्ट घालावे, एक टी शर्ट, एक समोरून उघडे शर्ट आणि आणखी एक टी शर्ट. वरचे टी शर्ट तुमच्या डोक्यावरून घाला आणि ते समोरून उघडया असलेल्या शर्टच्या गळयाखाली टाका.



जेव्हा तुम्ही पलटुन श्रोत्यांकडे पाठ करता तेव्हा युक्ती केली जाते. त्या क्षणी सर्वात वरचं शर्ट काढा आणि ते तुमच्या गळया भोवती गुंडाळा, उघड्या शर्टाच्या कॉलर खाली लपवित. आश्चर्य! तुमच्या अंगात दुसरे शर्ट आहे. शर्ट दुस-या रंगांचे असले तर चांगले आहे.

*लोकांसमोर हे करण्याआधी बरेचदा त्याचा सराव करा.*

## स्मृती चिन्हे

### *बिल्ला*

साहित्य:

- बिल्ल्याचा नमूना
- परितोषिक प्रत्येक मुलासाठी 1
- कुरळी रिबीन एक मिटर प्रत्येक मुलासाठी 1
- प्रत्येक मुलासाठी 20 मणी
- ऐच्छिक: रंगकांड्या, पेन्सिल, किंवा मार्कर


सूचना:

1. नमून्याचा प्रत्येक भाग वेगळा करा किंवा कापा
2. परितोषिकाला रंग द्या.
3. खूण केलेल्या छिद्रत कुरळी रिबीन टाका.
4. दोन्ही टोकांमध्ये मणी ओवा.
5. गाठ बांधा आणि पारितोषक तुमच्या गळया भोवती टांगा.

ह्या विषयाच्या शेवटी नमूना कागद आहे.




| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ये | शू | नं | सु | ड | शू | य | ब | ली | सु |
| णा | बा | ब | ली | चा | ल | णे | सं | शू | र |
| नं | य | सं | प्र | य | ड | सु | आ | णा | क्षि |
| ली | ब | रा | य | रा | अ | ली | नं | नं | त |
| ब | ल | सं | त्न | शू | य | णा | द | रा | य |
| ओ | ले | य | ली | णा | श | शू | ली | ब | सु |
| सु | ली | ब | सु | नं | स्वी | णा | वि | रा | सं |
| बो | णा | सु | ट | य | ल | सं | श्वा | सं | बु |
| ट | रा | ले | सं | सु | रा | नं | स | नं | ड |
| ली | य | ब | शू | ली | णा | भी | णा | ली | णा |
| टॉ | सं | बु | ड | णे | णा | ती | शू | य | रा |



एक अंक आहे ज्याची पुनरावृत्ती होत नाही. तो कोणता? **13**

एक अंक आहे जो तीनदा येतो, तो कोणता? **10**

एक अंक आहे जो ब-याचदा येतो, तो कोणता? **2**




3

14

5

6



## प्रश्न व उत्तरं

**1.- देव तुमच्या बरोबर असतांना सुध्दा तुम्ही कधी घाबरला काय आणि एखाद्या गोष्टीचा सामना केला नाही?**

कधी कधी आपण लाज आणणा-या कृती बद्दल सांगायला घाबरतो, किंवा इतर मित्र जे त्या क्षणी दुखावल्या जातील त्यांना शामिल करायला घाबरतो. आपल्या निर्णयांचे नेहमीच परिणाम असतात, परंतू देव आपल्याला समजण्यासाठी मदत करील की जर आपण नेहमी धैर्यवान आणि प्रमाणिक असलो तर परिणाम कमी दुःख दायी असतील. रोम 8:37

**2.- ही येशूचा नकार केला काय आणि तसे केल्यामूळे तुम्हाला कसे वाटते?**

ब-याच प्रसंगी आपण आपल्या सहा-यासोबत किंवा मित्रासोबत येशू बद्दल बोलू शकतो, परंतू भिती आपल्याला अशा प्रकारे धरून ठेवते की आपण तसे करत नाही. एका प्रकारे ते आपला विश्वास आणि येशूला नाकारणे आहे. आपल्याला खूप वाईट किंवा निराश वाटू शकतो कारण त्याने कधीच आपला नाकार केला नाही. परंतू वाईट वाटणे आपल्याला ती गोष्ट करण्यासाठी प्रेरित करू शकते जी आपण एकेकाळी करू शकलो नाही. 1 योहान 1:9

**3.- जर तुमच्या सर्वात चांगल्या मित्राने सर्वांसमोर तुमचा नाकार केला तर तुम्हाला कसे वाटेल?**

बरेचदा आपल्याला राग आणण्यासाठी जो मित्र काही तरी करते तेव्हा आपल्याला राग येतो, परंतू जर त्याने तुमची मैत्री नाकारली तर तुम्ही नेहमीसाठी मैत्री गमावू शकता. जे आपली लाज धरतात त्यांच्यासाठी कधी कधी पहिली भावना निराशा असते, नंतर राग आणि नाकार. हे स्पष्ट उदाहरण आहे की येशूच्या मनात आपल्यासाठी किती प्रीती आहे की आपण पापी असतांना सुध्दा, त्याच्या मरणाने आपल्याला जीवन दिले. रोम 5:8

# स्मृती चिन्हे

नमुना कागद

नीतिसूत्रे 30:5
“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे;
त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो
ढाल आहे."

Equip & Grow

नीतिसूत्रे 30:5
“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे;
त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो
ढाल आहे."

Equip & Grow

नीतिसूत्रे 30:5
“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे;
त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो
ढाल आहे."

Equip & Grow

नीतिसूत्रे 30:5
“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे;
त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो
ढाल आहे."

Equip & Grow

नीतिसूत्रे 30:5
“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे;
त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो
ढाल आहे."

Equip & Grow

नीतिसूत्रे 30:5
“ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे;
त्याचा आश्रय करणाऱ्यांची तो
ढाल आहे."

Equip & Grow

# 3 केवळ तुम्ही स्वतः असा!

भितीः प्रामाणिक किंवा असुरक्षित असण्याची भिती.

## चालना देणारी कृती

प्रौढांप्रमाणेच मुलं देखील आपल्या दैनंदिन जीवनाच्या तक्रारींवर अधिक लक्ष केंद्रित करतात आणि त्यांचे अनेक आर्शीवाद मान्य करणे विसरतात. ''तुमचे आर्शीवाद मोजा'' ही कृती त्यांची मनं समायोजित करू शकते की त्यांनी आभारी का असावे. सर्वात सोपा प्रकार हा आहे की ह्या वाकप्रचाराने सुरवात करावीः ''मी ......साठी आर्शीवादीत आहे'' किंवा मी .....साठी आभारी आहे आणि मुलांमध्ये चाला; एकाला निवडा आणि त्याला वाक्य पूर्ण करू द्या. ज्यास्तीत ज्यास्त उपस्थितांबरोबर ह्याची पुनरावृत्ती करा. त्यांना मुंगीच्या आवाजात, किंवा अस्वलीच्या आवाजात हळू इ. रित्या पुनरावृत्ती करण्यासाठी सांगून त्यात मजा आणा. ह्या रितीने तुम्ही त्या क्षणाला वेगळा आणि मजेशीर स्पर्श करू शकता.
मोठ्या मुलांसोबत, तुम्ही त्यांना त्यांचे आर्शीवाद आणि आभार एका कागदावर आधीच लिहून एका बक्षिसाच्या डब्यात टाकायला सांगू शकता. मुलं येण्याआधी डबे लपवून ठेवा; स्वगताच्या वेळेस त्यांना हे खजीने शोधायला सांगा.

त्यांना एकत्र करा आणि त्यांना आळी पाळीने डबे उघडून त्यांच्या साथीदारांचे आर्शीवाद वाचायला सांगा.

## पडद्या मागे

विदूषक मेकअपने त्याचे तोंड रंगवत आहे आणि नंतर त्याचा मित्र कडक दोरीवर चालणारा ह्याच्या कडे रडतो. तो त्याच्या भितीच्या आणि असुरक्षिततेच्या भावना सांगतो. त्याला वाटते की त्याने ह्या बनावटी मुखामागे लपले पाहिजे आणि तो खरा कोण आहे हे लोकांना पाहू देऊ नये, कारण जर त्यांना तो आवडला नाही तर किंवा ते त्याच्या विनोदांवर हसले नाहीत तर? विदूषक सिंह प्रशिक्षकाला इतरांबरोबर हसतांना आणि चांगला वेळ घालवितांना पाहतो आणि त्याला त्यांच्या मैत्रीचा हेवा वाटतो. तो श्रोत्यांमधील मुलांना सांगतो की त्याला वाटते की तो देखील सिंह प्रशिक्षकाचा मित्र असायला हवा होता अशी त्याची इच्छा आहे.

## कार्यक्रम सुरू होऊ द्या!

येशू पिलातासमोर देव असल्याचे स्वीकारतो,

लूक 23:1-4, 13-16

- प्रामाणिक किंवा असुरक्षित असण्याची भिती -

दररोज इतरांबरोबर प्रामाणिक आणि असुरक्षित असण्याच्या भितीचा आपण सामना करतो. आपण कोण आहोत हे लपविण्याचा आपल्याला मोह होतो, जसे आपला मित्र विदूषक ह्याने आज सांगितले, आपण ढोंगी चेह-या मागे लपू इच्छितो. कधी कधी ते खोटे हस्य असते किंवा शाळेतील खेळामध्ये भाग घेण्याची इच्छा असण्याचे ढोंग असते कारण आपण विचार करतो की सर्व तशी अपेक्षा करतात. तुम्ही कसे आहात असे कोणी तुम्हाला विचारले आणि तुम्ही आतून खूप दुःखी असूनही तुम्ही ''ठिक आहे'' असे म्हटले? तुम्ही ''स्वतः असण्यासाठी'' कधी घाबरले काय?

आपण सर्वांनी ह्या भितीचा सामना केला आहे आणि येशूने सुध्दा तो केला. आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीत येशूला पिलातासमोर आणण्यात आले, जो राज्यपाल होता, आणि लोक मागणी करत होते की त्याला मारण्यात यावे! लोकांना येशूचा इतका राग आला होता की त्यांनी त्याच्यावर आरोप लावला की तो नियम मोडणारा बंडखोर आहे. परंतू हे खोटे आरोप होते!! तुम्ही कधी जी चूक केली नाही त्याचा आरोप तुमच्यावर लागला काय?

ही ती वेळ नव्हती जेव्हा येशू असुरक्षित असू इच्छित होता. तो राज्यापालाबरोबर प्रमाणिक राहून तो कोण आहे हे सांगू इच्छित नसावा. तो कोण आहे हे लपविण्याची त्याची नक्कीच इच्छा असेल. परंतू जेव्हा पिलाताने म्हटले,'' तू यहूदयांचा राजा आहेस काय?'' येशूने प्रामाणिकपणे उत्तर दिले, ''तू म्हणतो तसेच आहे.''

नक्कीच काही वेळा असतील जेव्हा खोटे हस्य आणणे ठिक राहिल. जीवनात धोकादायक परिस्थिती राहतील जेव्हा आपण स्वत:ला सुरक्षित ठेवले पाहिजे. परंतू ब-याच वेळेस, हे महत्वाचे आहे की आपण इतरांबरोबर प्रामाणिक असावे आणि आपण कोण आहोत हे मान्य करावे, जसे येशूने केले. तुम्ही काय असावे अशी इतरांची काय इच्छा आहे, किंवा त्यांच्या तुमच्या बद्दल काय अपेक्षा आहेत असे तुम्हाला वाटते ह्याची पर्वा नाही. तुम्ही जे आहात ते असणे तुमच्यासाठी चांगले आहे. कधी कधी आपण आपल्या मित्रांबरोबर खरे नसतो आणि आपण त्यांना गमावितो. किंवा आपण इतके ढोंग करतो की आपल्याला मित्र नसतात, आणि आपण आतून रिकामे असतो. खरे मित्र बनविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच्या बरोबर खरे व प्रामाणिक असणे; आपला मुखवटा काढणे किंवा आपल्या तोंडावरील विदूषकाचे मेकअप धुणे. जेव्हा आपण खरा प्रामाणिक संवाद करतो आणि आपण गहण मुद्याबद्दल बोलतो तेव्हा आपण आपुलकीची भावना अनुभवतो. खरे असणे आणि खोटे नसणे खूप चांगले वाटते.

येशूची इच्छा नव्हती की त्याला मारण्यात यावे, परंतू तो जे नाही ते असण्याचे ढोंग सुध्दा तो करू इच्छित नव्हता. प्रामाणिकपणे धोका पत्करणे भितीदायक होते, परंतू ते चांगल्या जीवनाकडे नेते! तुम्ही ''स्वत: असून'' तुमची असुरक्षित असण्याच्या भितीची जोखीम घेण्यासाठी तयार आहात काय?

## पाठ करा

शया 43:4 "तू माझ्या दृष्टीने अमोल आहेस; तू मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुझ्यावर प्रेम करतो, म्हणून तुझ्याबद्दल माणसे व तुझ्या जिवाबद्दल राष्ट्रे मी देईन."

## स्मृती चिन्ह

### छोटा सर्कस तंबू




साहित्य:

- सर्कस तंबूचा नमूना
- कैची
- डिंक
- रंग कांड्या, पेन्सिल, किंवा मार्कर.

1. मून्याचा प्रत्येक भाग कापा.
2. गोलाच्या आतील भागाला रंगवा तो सर्कसचे छप्पर राहिल.
3. आखलेल्या रेषेवर मध्य भागापर्यंत गोल कापा.
4. दिलेल्या जागेत आयात चिटकवा, प्रत्येक आकृती एकावर एक ठेवत.
5. जे छप्पर तुम्ही गोलाने तयार केले त्यावर, माचीसची काडी किंवा दात कोरनी वापरून लोगो झेंडा असा लावा.
6. आयातात कृती करा.
7. आयात पुंगळीत गोल करा आणि दिलेल्या जागी चिटकवा.
8. पुंगळीवर तंबूचे छप्पर ठेवा.
9. तुमचे मार्गदर्शन करण्यासाठी चित्र पाहा.

विषयाच्या शेवटी नमूना कागद आहे.


## लहान कलाकार

### *संतुलनकार*

मुलांसाठी एक महत्वाची प्रथम कृती म्हणजे त्यांचे स्नायू संतुलन कौशल्यावर काम करणे, ह्यासाठी आपण वेगवेगळया वस्तू वापरणार आहोत जे घरी सहज सापडते जसे झाडूची काडी किंवा प्लास्टिकचा कप किंवा इतर कुठलेही साहित्य जे तुटत नाही.

ह्या भागात मुलं विविध कृतींद्वारे त्यांचे संतुलन सुधारणे शिकतील जिथे ते त्यांचे स्नायू संतुलन कौशल्यावर काम करू शकतात.

ह्या कृतीसाठी मुलं त्याच्या तळहातावर एक काडी ठेवतो आणि जो पर्यंत शक्य आहे तो पर्यंत त्याने संतुलन राखावे. एकदा मुलाने हे कौशल्य प्राप्त केले, तर प्लास्टिकचा कप वापरून अधिक कठिण पातळीवर वाटचाल करा. कपाचे तोंड खाली करून त्याला काडीवर ठेवले जाते. अशा प्रकारे ते उत्तम कडक दोरीवर चालणारे होण्याच्या मार्गावर दोन वस्तूंचा उपयोग करून त्यांचे कौशल्य सुधारू शकतात.



## कलाबाजी


### *लक्षाला मारा*

साहित्य

पारदर्शक नसलेलला पुठ्ठा किंवा कापड, 1 मी रूंद आणि 2 मी लांब कागदाचे 10 तुकडे किंवा चेंडू तयार करता येईल असे जे तुमच्याकडे उपलब्ध आहे ते

सूचना

दोन मुलांनी (प्रत्येक संघाचा एक) कापड किंवा पुठ्ठा धरावा.
एका संघाने पडद्या किंवा पुठ्ठयामागे उभे राहावे, आणि दुसरी त्याच्या समोर ओळीत उभी राहिल.




पडद्या मागील मुलं असमानपणे वर आणि खाली जातात. आणि पुढील मुलं एक एक करून 10 कागदाच्या चेंडूनी दुस-या संघाला त्यांच्या मध्ये 1.50 मिटरच्या अडखळनातून मारतात.

जेव्हा संघाच्या सर्व मुलांना संधी मिळते तेव्हा जागा बदला. जो संघ अडखळणाच्या मागील सर्वात ज्यास्त मुलांना मारू शकतो तो जिंकतो.

मोठ्या  मुलांसाठी अंतर 2 मिटर दूर असेल आणि त्यांना त्यांचे चेंडू फेकण्यासाठी 30 सेकंद मिळतील.

## आनंदाच्या ठिणग्या

देवामध्ये ओळख स्थापन करण्यासाठी, ते कोण आहेत आणि त्यांचा उद्देश काय हे जाणण्यासाठी ही मुलांसाठी फार विशेष  वेळ आहे.

आपण अंकल ॲबनेर चे ‘‘आय डी’’ ह्या गाण्याचा समावेश करू ज्याचा उपयोग करून तुम्ही सर्व वयोगटाच्या मुलांना हे शिकवू शकता की प्रत्येकाकडे असलेली सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, त्यांची ओळख....

हजर असलेल्या सर्वांबरोबर ह्या गाण्यासोबत संगीताचा आनंद घ्या, परंतू गीताच्या शब्दांवर तुम्ही भर द्याल हे निश्चित करा.

## गृहपाठ


### *लहान थिएटर*

**मुलांना सांगा की घरी त्यांनी त्यांच्या आईवडीलांसोबत सिरियल डब्यापासून तयार केलेले थिएटर त्यांनी वापरावे ह्यासाठी की जे ते आज शिकले ते लक्षात रहावे.**


**घरी कृतीसाठी वेळ काढावा म्हणून त्यांना प्रोत्साहित करा.**


# विद्यार्थी पुस्तक


| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मो | ळ | ल | क | हा | जो | दुः | ख |
| मु | हा | णि | स्य | प्र | खी | मु | व |
| ख | मा | त | ल | ष | म | ख | ला |
| प्र | ख | ळ | प | मो | दे | व | दुः |
| हा | रा | जा | णे | ड | ला | टा | ळ |
| टा | ता | खी | हा | ष | ले | ह | स्य |
| दुः | प्र | ळ | दो | क | जो | खी | भि |
| खो | टे | व | णे | प्र | स्य | हा | ती |














## \प्रश्न व उत्तरं

**1. जे तुम्ही केले नाही त्याचा खोटा आरोप तुमच्या वर कितीदा लावण्यात आला? तुम्हाला कसे वाटले?**

कदाचित जेव्हा कोणाला तरी आपले नाव खराब करून किंवा आपल्या प्रमाणिकपणावर डाग लावून आपल्याला नुकसान करायचे असते तेवहा आपण जे केले नाही त्याच्या बद्दल खोट्या आरोपाचा आपल्याला सामना करावा लागला असेल. कदाचित आपली प्रतिक्रिया मजबूत असेल की आपली प्रतिष्ठा सुरक्षित ठेवावी. परंतू देव आपल्याला सांगतो की जशी त्याने आपल्याला क्षमा केली तशी आपणही त्यांना क्षमा केलीच पाहिजे. अशा प्रकारे देव आपला विश्वास मजबूत करू शकतो हे दाखविण्यासाठी की आपण त्याचे मुले आहोत. मत्त्य 5:11-12


**2.- तुम्ही कोण आहात ह्याबद्दल तुम्ही कधी खोटे बोलला का? का?**

ख्रिस्ती ह्या नात्याने आपली सर्वात मोठी भिती ही असते की जे लोक येशूला ओळखत नाहीत त्यांच्यामध्ये सामाजिक गोलात, शाळेत, कामाच्या जागी किंवा कुटुंबामध्ये स्वीकार न होणे. कधी कधी त्यांच्या कडुन स्वीकृत होण्याच्या आपल्या शोधात आपण ख्रिस्तामधील आपली ओळख नाकारतो. देवाचे मुल होण्यासाठी तुम्ही लाज धरण्याची गरज नाही. त्या उलट, प्रभू आपल्याला प्रेमाने आणि ज्ञानाने आपले ओळख सुरक्षित ठेवण्यासाठी सामर्थ्य देऊ शकतो. यिर्मया 5:19 रोम 1:16

**3.- धडयाचये मुख्य नैतिक मूल्य काय आहे आणि तुम्ही त्याचे लागूकरण तुमच्या जीवनात कसे करू शकता?**

प्रामाणिकपणा हे दररोज वापरण्यासाठी कठिण मूल्य आहे, बरेचदा आपण प्रामाणिक असण्यासाठी घाबरतो, अनेक कारणांमूळे, लोक काय म्हणतील ह्या भितीने. एखाद्या मित्रासाठी किंवा कुटुंबातील सदस्यासाठी उभे राहणे, देव ज्या गोष्टीचा सल्ला देतो तो हा की आपण सर्व बाबतीत नेहमी सत्य सांगावे, विशेषत: आपण कोण आहोत त्या बाबतीत. प्रामाणिकपणा ती किल्ली आहे जी पुष्कळ ठिकाणी आपल्यासाठी दार उघडू शकते.

# स्मृती चिन्हे




तुम्ही आज देवाला काय देता?

काहीतरी काढा आणि त्याला रंग भरा

यशया 43:4

"तू माझ्या दृष्टीने अमोल आहेस; तू मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुझ्यावर प्रेम करतो, म्हणून तुझ्याबद्दल माणसे व तुझ्या जिवाबद्दल राष्ट्रे मी देईन."

इथे चिटकवा

# 4 केवळ भरवसा ठेवा!

**भिती: आजार किंवा दुःखाची भिती.**

## सुरवातीची कृती

*एकत्र व्हा आणि भेटा*

वेगवेगळया रंगाचे कंचे, लाकडाचे तुकडे किंवा कागदं तयार करा

प्रत्येक मुलाला त्यातील भरपूर घेवू द्या (किंवा जे तुमच्या कडे उपलब्ध आहे ते.) प्रत्येक रंगाला वेगळा अर्थ द्या

निळा: कुटुंब.
हिरवा: शाळा.
पिवळा: मित्र.
लाल: छंद.
कथ्था: संगीत/चित्रपट.
त्यांच्या हातामध्ये जितक्या वस्तू आहेत त्या ठरवतील की त्यांना किती परिस्थिती मोजायच्या आहेत. उदा. जर त्यांच्या कडे दोन पिवळे आहेत तर, त्यांना मित्रांना दोन वास्तविकता सांगयच्या आहेत.

## पडद्या मागे

विदूषक काही कलाबाजी आणि झुला कलाकाराला काही अद्भुत खेळ करतांना पाहतो. (यूटयूबचा व्हिडिओ सुरू करा किंवा तुमच्या कमचा-यांना काही खेळ करायला लावा.) तो विचार करतो की जर तो पडला तर ते किती दुःखदायी होईल? त्याच्या हे लक्षात येत नाही की त्याठिकाणी त्यांना झेलण्यासाठी एक जाळी आहे, आणि त्यांना पडण्यापासून वाचविण्यासाठी त्यांच्या कंबरेला एक दोरी बांधली आहे. तो भरवसा ठेवण्यासाठी तयार राहिल काय? सिंह प्रशिक्षण पुन्हा बाजूने जातो आणि विदूषक उठून त्याच्याशी बोलण्यासाठी धैर्य घेण्याचा प्रयत्न करतो परंतू तो घाबरतो आणि तसे करणार नाही.

कलाबाज आणि झुला कलाकर. मी पडलो तर जाळी मला पकडेल काय?

## कार्यक्रम सुरू होऊ द्या!

**येशूचा वधस्तंभावरील मृत्यू, लूक 23:26-49**

-आजार किंवा दुःखाची भिती-

आपले अधिकाधिक जग अधिक आजर आणि दुःख पाहत आहे. कोविड आजारासोबत महामारी वाढत आहे, भूमिकंप आणि पूर वाढत आहेत, आपण आपल्या सभोवती आजार आणि दुःख पाहत आहोत. आजच्या विदूषकाप्रमाणे, ज्या गोष्टी आपण पाहू शकत नाही त्याची आपल्याला भिती वाटते आणि आपण आपल्या भविष्यातील दुःखासंबंधी काळजी करतो. जेव्हा येशू बागेमध्ये प्रार्थना करण्यासाठी गेला तेव्हा त्याने देखील त्याच्या भविष्यातील दुःखाची काळजी केली. त्याला माहित होते की त्याला अटक करून बंदी केले जाईल. त्याला माहित होते की ते त्याला मारतील आणि त्याच्यावर थुंकतील म्हणून त्याने देवाला विनंती केली की त्याने येणारे दुःख दूर करावे. परंतू येशू देवावर ‘‘केवळ भरवसा’’ ठेवण्यासाठी तयार होता!

त्यांनी लवकरच येशूला अटक केली जसे की त्याला माहित होते. त्यांनी त्याला मारले आणि त्याच्यावर ते हसले. त्यांनी त्याच्यासाठी वधस्तंभ तयार केला आणि तो त्याला टेकडीवर न्यायला लावला. त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले आणि त्याला तिथे सार्वजनिक रित्या मरण्यासाठी सोडून दिले. तो ही सर्व

वेळ थांबवू शकला असता. तो त्यांना सांगू शकला असता की तो देव आहे आणि वधस्तंभावरून खाली येऊ शकला असता. परंतू तो तिथे थांबला कारण तो आपल्या वाईट वागणूकीची किंमत भरू इच्छित होता. येशू त्या दिवशी आपल्या पापांची शिक्षा घेण्यासाठी मरण पावला. त्याला माहित होते की

स्वत:चे अर्पण करून तो तुम्हाला वाचवित आहे! येशू तुमच्या आणि माझा भरवसा प्राप्त करण्यासाठी वधस्तंभावर थांबला. आपल्या पापांपासून आणि वाईट वागणूकिपासून आपल्याला स्वतंत्रता देण्यासाठी त्याने हे केले!

आज तुम्ही कोणत्या दु:खाला आणि आजाराला घाबरत आहात?

पवित्र शास्त्र सांगते की जे सर्व जण येशूवर विश्वास ठेवतात आणि त्याच्या नावाचा धावा करतात त्यांचे तारण होईल. तुम्हाला आणि मला ‘‘केवळ भरवसा’’ ठेवण्याची, येशूवर विश्वास ठेवण्याची आणि आपले मन त्याच्यासाठी उघडण्याची संधी आहे. पवित्र शास्त्र सांगते की आपण आपले मन उघडणे आणि प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे ही साधी परंतू अतिशय कठिण गोष्ट करू शकतो, मग आपण ख्रिस्ती किंवा विश्वासणारे बनू शकतो. आपण देवाचे मुलं बनू शकतो! देव आपल्याला त्याच्या कुटुंबामध्ये दत्तक घेतो आणि देव आपल्या मनामध्ये येतो. ह्याचा अर्थ हा नाही की आपण परिपूर्ण होतो. आपण तरी सुध्दा आधी सारखे त्याच वाईट वागणूक आणि भितीसोबत संघर्ष करतो. परंतू जेव्हा आपण हे संघर्ष व भिती ह्यांचा सामना करतो तेव्हा आपल्याला मदत करण्यासाठी देव आपल्या मध्ये राहत असतो! आज तुम्ही एकत्र प्रार्थना करून देवाची मुलं बनू इच्छिता काय? तुमच्या जीवनासाठी तुम्ही ‘‘केवळ भरवसा’’ ठेवण्यास तयार आहात काय?

माझ्या बरोबर प्रार्थना करा,

‘‘प्रिय येशू, माझ्या वाईट वागणूकीसाठी वधस्तंभावर मरण्यासाठी तुझे आभार मानतो. माझे आजार आणि दु:ख घेण्यासाठी आणि बलिदान दिल्याबद्दल तुझे आभार. मी विश्वास ठेवतो की जसे पवित्र शास्त्र सांगते तसे तू जगला आणि माझ्या साठी मरण पावला. मी जसा आहे तसा माझ्या हृदयामध्ये आज ये. मी आज तुझ्या वर भरवसा ठेवण्याची निवड करतो जरी मला पुष्कळ भिती आहे तरी. कृपाकरून माझ्या हृदयात ये आणि माझ्या जीवनाचा मालक हो. आमेन’’

## पाठ करा

स्तोत्र 118:8 "मनुष्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा परमेश्वराला शरण जावे हे बरे."

## आनंदाच्या ठिणग्या

संधीचा फायदा घ्या आणि ‘‘एनकाउंटर विथ गॉड’’ ह्या जाझहू व वाय थ्श ह्यांच्या गीताद्वारे सेवा करा, ते आपल्याला आठवण करून देते की, आपले जीवन आपले असणे हे देवाला दिल्याने आपण आपल्याला ज्या गोष्टींची गरज आहे त्याने भरून जावू.

देवाच्या सानिध्याला प्रत्येक मुलात आणि मुलीत हे कार्य करू द्या, आर्शीवादाचे पात्र बना आणि ज्या ठिकाणी तुम्ही आहात तिथे तारण आणि मुक्ती वाहू द्या.

## स्मृती चिन्ह

### <u>तंबू</u>

*साहित्य:*

- तंबूचा नमूना
- रंग किंवा रंग कांड्या
- कैची
- कागदाचा 1 तुकडा

*सूचना*


1. नमून्याच्या तुकड्यांना रंग भरा
2. प्रत्येक तुकडा कापा
3. पानाच्या तुकड्याचा लहान पंख्यासारखे तयार करा
4. तंबूचे दार आणि येशूची आकृती ह्याच्या मध्ये ते चिटकवा
5. स्लीप मोठ्या  तंबू आणि येशूची आकृती असलेल्या दाराच्या मध्ये टाका.

*नमूना कागद विषयाच्या शेवटी आहे.*





## लहान कलाकार

*<u>सर्कस मधील सर्वात बलशाली</u>*



मुलांच्या वाढीसाठी त्यांच्या शरीराच्या ठेवणीचा विकास करणे महत्वाचे आहे, ही कृती त्यांच्या ठेवणीला कायम ठेवण्याच्या त्यांच्या क्षमतेची चाचणी करेल, त्यांच्या पायावर जोर देणे आणि त्यांच्या हाताची लवचिकता वापरत आणि दोरी आणि बॉल किंवा काही प्लास्टिकचा डबा ह्या सारखे साधे साहित्य घेऊन.

सर्वप्रथम करावयाची कृती (20 मीमी रूंद) जाड आणि 5 मिटर लांब दोरी घेणे. जे महत्वाचे आहे की दोरीला दोन्ही टोकांवर मजबूत गाठीने बांधावे.



चार गटात विभागा आणि प्रत्येक गटातून एका व्यक्तिला दोरीच्या आतसाठी निवडा. ह्या चार मुलांनी दोरी त्यांच्या कंबरेवर ठेउन बाहेरच्या दिशेला ओढत चैकोन तयार करावा. मग चार वस्तू प्रत्येक मुलापासून तीन पावलांच्या अंतरावर ठेवण्यात येतील. उदिष्ट हे आहे की वस्तू सर्वप्रथम प्राप्त करावी.


## कलाबाजी

### *ओढणारा माकड*

*साहित्य*

प्रत्येक गोलाला प्रत्येक दोरी बांधा
एक सुरवातीचा बिंदू आणि गोल किंवा उद्दिष्ट नेमा
गटाला पाच किंवा दहा मुलांच्या संघात विभागा
प्रत्येक संघातून एक मुल निवडा गोल दोरीने ओढण्यासाठी.


प्रत्येक खेळाडूने गोलातून गेलेच पाहिजे
ज्या संघाचे सर्व सभासद गोलातून प्रथम जातील तो विजेता राहिल.




मोठ्या मुलांसाठी एक अधिक नियम देता येईल, जो कोणी गोल सोडतो त्याने सुरवातीपासून सुरू करावे.

# विद्यार्थी पुस्तक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ली | श | के | वे | द | ना | ग | ळे | ली | चा |
| ळे | मा | ले | खि | ग | हे | श | क | क्षा | बू |
| के | हे | र | ली | के | फु | ले | ट | ट | क |
| खि | के | क्षा | हा | श | ली | खि | अ | हे | मा |
| ळे | त्या | न्य | ग | ण | ट | ळे | क्षा | श | र |
| ठो | ग | ळे | या | बू | के | के | शि | बू | ला |
| क | के | मृ | ले | धी | बू | ली | क्षा | ली | के |
| ले | त्यू | ग | ली | ट | श | क्ष | ग | ये | शू |
| हे | के | श | नि | र्दो | ष | ळे | के | ट | ले |
| ली | क्षा | आ | शा | आ | हे | खि | दो | षी | हे |






1

14

3

18



प्रशिक्षक: 5
सर्कसचा मालक: 1
जगलर: 3
विदुषक: 4
पटकोन कलाकार: 2

## प्रश्न व उत्तरं

**1.- भविष्यासाठी तुमची सर्वात मोठी चिंता कोणती होती आणि तुम्ही ती कशी हाताळली?**

आपण अनेक गोष्टींची चिंता करत असतो, आणि ते स्वाभाविक आहे. बरं भविष्यात काय होणार आहे ह्या बद्दल कोण चिंता करत नाही, कारण अशा परिस्थिती असतात ज्या आपल्या शक्ति पलिकडे असतात, जसे कोविडचा वायरस ज्याने जगावर परिणाम केला? पुष्कळांसाठी भविष्य अनिश्चित आहे, कुटुंबाच्या गरजा पूर्ण न करू शकण्याची भिती किंवा स्वप्न पूर्ण न करू शकण्याची भिती. देव भविष्यासाठी सुध्दा निश्चींती आणू इच्छितो. तो आपल्यासाठी सर्वात उत्तम ते इच्छितो आणि तो आपल्याला कधीच अंतर देणार नाही. परंतू त्याच्या विरूध्द, त्याची प्रिती कोणत्याही परिस्थिती शिवाया पूर्ण होते. तो आपल्याला भरपूर जीवनाचे आश्वासन आणि प्रिती देतो. आपण त्याभितीचा समान कदाचीत असा केला पाहिजे, केवळ देवावर भरवसा ठेवून. यिर्मया 17:7-8 (तुमच्या विद्यार्थ्यांना ते वयैक्तिक रित्या वाचू द्या)


**2.- जीवनाच्या बक्षीस जे देवाने त्याचा पुत्र येशू ह्याच्या मरणा द्वारे आपल्याला दिले त्याच्यासाठी तुम्ही कसे आभारी आहात?**

आभारी असणे ही गोष्ट सर्वचजण करत नाही, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे सुध्दा. जेव्हा आपण वागणे किंवा बोलणे ह्यासंबंधी हूशार बनतो, दररोजसाठी आभार मानतो, किंवा कठिण प्रसंगामध्ये सुध्दा त्याची स्तुती करतो तेव्हा देव त्याचा आनंद मानतो. तक्रार करणे किंवा स्वत:ची किव करणे, आपण एकटे आहोत असे मानणे ह्या पेक्षा ते बरे आहे. स्तोत्र 138:7-8


**3.- देवावर भरवसा ठेवणे तुमच्यासाठी कठिण आहे काय? का?**

जेव्हा आपण विचार करतो की सर्वकाही आपल्यावर अवलंबून आहे ते कादाचीत ह्या कारणाने असू शकते की आपण विश्वास ठेवतो की आपण देवाशिवाय सर्व प्राप्त करू शकतो. परंतू तसे नाही आहे. देवाची इच्छा आहे की आपण चांगले असावे, परंतू आपण ते केवळ आणि आपल्या प्रत्येकासाठी त्याच्या जवळ ज्या योजना आहेत त्यावर भरवसा ठेवून प्राप्त करू शकतो. एका प्रकारे प्रभूवर भरवसा ठेवणे ह्यासाठी आपल्याला किंमत लागणार नाही कारण आपण त्याच्याबरोबर अद्भूत गोष्टी करू शकतो आणि त्याच्या शिवाय आपण काहीही करू शकत नाही. योहान 15:5 " मी वेल आहे, तुम्ही फाटे आहा; जो मजमध्ये राहतो आणि मी त्याजमध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो; कारण मजपासून वेगळे असल्यास तुम्हाला काही करिता येत नाही." परंतू कठिण क्षणांमध्ये देवावरचा भरवसा सर्व काही होतो, जरी काही वेळेस त्याची किंमत आपल्याला द्यावी लागली तरी. कठिण प्रसंगामध्ये आपली स्वस्थता भरवसावर अवलंबून राहिल. नीतीसूत्रे 3:5-8

स्मृती चिन्ह





नमुना कागद

# 5 केवळ प्रीती करा

भितीः नकाराची भिती व एकटेपणा.

## सुरवातीची कृती

### *पवित्र शास्त्रातील पात्र*

ज्या मुलांनी सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेत भाग घेतला आहे त्यांनी पवित्र शास्त्राबद्दल अनेक गोष्टी ऐकल्या आहेत. एक कल्पना ही आहे की पवित्र शास्त्रातील पात्रांबरोबर उखाणे खेळावे; एक मुल पात्राचा अभिनय करतो आणि इतर ओळखतात. तुम्ही नविन पात्र निवडल्या नंतर, वेळ संपेपर्यंत खेळत रहा. आणखी एक प्रकार हा आहे की मुलं येतात तेव्हा त्यांच्या पाठीवर पवित्र शास्त्रातील पात्रांचे नाव असलेले कार्ड लावावे.

मुलांनी त्यांची ओळख न सांगता ते कार्ड वाचावे. प्रत्येक मुलाने ''होय किंवा नाही'' हा प्रश्न विचारावा हे ओळखण्यासाठी की त्यांच्या पाठीवर कोणते पात्र आहे.

## पडद्या मागे

विदूषक उत्साही आहे की सिंह प्रशिक्षकाने सर्कसच्या अंतीम भव्य कार्यक्रमासाठी सिंहाला बाहेर आणले आहे. जेव्हा सिंह प्रशिक्षक सिंहाने ज्याच्या तून उडी मारावी तो गोल पकडतो तेव्हा व्हीडिओ प्रोजेक्टर वर ज्वाला दिसतात (असे भासवत की त्याला आग लागली आहे) विदूषकाला वाटते की हा कार्यक्रम खूपच चांगला आहे, परंतू तो स्वत:ला कार्यक्रमत्याला सादर करण्यासाठी घबरत आहे नकाराच्या भितीमूळे. तो त्याला भेटण्यासाठी आठवडाभर उत्साही होता, परंतू जर त्याला नकारले गेले तर? स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठी ''हाय'' म्हणणे सुरक्षित राहणार नाही काय? शेवटी विदूषकाला तसे करण्यासाठी धैर्य प्राप्त होते, आणि तो सिंह प्रशिक्षकाच्या जवळ जाऊन ''हाय'' म्हणतो. ते लगेच बोलू लागतात आणि मित्र होतात. ते गप्पा मारत मंचाच्या खाली जातात जणू काही जुने मित्र आहेत, आणि विदूषक श्रोत्यांकडे मागे वळून पाहतो आणि अंगठा दाखवितो!

## कार्यक्रम सुरू होऊ द्या!

येशू मरणातून जिवंत होतो! लूक 24:1-12, 36-42
-नकाराची भिती आणि ऐकटपणा-

प्रीतीसाठी आपले मन उघडे करणे ही सर्वात भितीदायक गोष्ट नाही काय? आपल्यातील प्रत्येक जण नकार आणि ऐकटेपणा ह्याला घाबरतो. देवाने आपल्याला इतरांवर प्रीती करण्याची आणि आपल्यावर प्रीती करण्याची गरज असलेले असे सामाजिक मानव असे बनविले आहे. प्रीती आणि नात्याशिवाय आपण जगू शकत नाही. प्रीती शिवाय आपण केवळ जिवंत आहोत, एक भोजनापासून दुस-या भोजनापर्यंत ठिक राहत. आपल्या सर्वांना समाजाची गरज आहे, मित्रांसोबत बोलण्याची, प्रीती करण्यासाठी सर्वात चांगल्या मित्राची आणि मग एक दिवस लग्न करण्याची आणि कुटुंब असण्याची गरज आहे. परंतू इतरांसाठी आपले मनं उघडणे कठिण आहे विशेषत: जेव्हा आपण आधी दुखाविले गेलो आहोत तेव्हा. जर मला पुन्हा नकारले गेले तर? जर त्यांनी माझ्या वर पुन्हा प्रीती केली नाही तर? मी इतरांपर्यंत पोहचण्यासाठी आणि ''केवळ प्रीती'' करण्यासाठी पूरेसा धैर्यवान होऊ शकतो काय?

येशू पृथ्वीवर असतांना त्याने सुध्दा तशाच भितीचा सामना केला. त्याला मित्र, प्रेमाचे लोक, कुटुंब आणि ओळखीचे लोक होते. त्याने त्याचे मन लोकांसाठी उघडले, आणि त्यांनी सारखे सारखे त्याला नकाराले. त्याचे मन अनेकदा तोडण्यात आले. मग त्याने सर्वात अंतीम बलिदान दिले, जसे आपण मागील धडयामध्ये शिकलो, जिथे तो तुमच्या आणि माझ्या साठी वधस्तंभावर मरण पावला. परंतू गोष्ट इथे संपली नाही!

तिस-या दिवशी सकाळी स्त्रीया त्या कबरेजवळ गेल्या जिथे येशूला पुरण्यात आले होते. येशू वधस्तंभावर मरण पावल्यानंतर, त्याच्या शिष्यांनी व कुटुंबाने त्याला तोंडाजवळ एक मोठा दगड असलेल्या गुहेसारख्या कबरेमध्ये ठेवले. परंतू जेव्हा स्त्रीया कबरेजवळ आल्या तेव्हा त्यांना दिसले की मोठा दगड

बाजूला सरकवलेला आहे, आणि कबर रिकामी होती! त्यांना भिती वाटली की कोणी तरी त्याचे शरीर चोरले आहे. परंतू एक देवदूत त्यांना तिथे भेटला आणि त्याने स्त्रीयांना सांगितले की येशू त्याने सांगितल्याप्रमाणे जिवंत आहे.  लवकरच येशूचे शिष्य एकत्र जमले असतांना येशू त्यांना दिसला. ते आश्चर्यचकित झाले आणि त्याला जिवंत पाहून आनंदी झाले! हिच गोष्ट आहे जी ख्रिस्तीपणाला इतर धर्मापेक्षा वेगळे करते. आपला पुढारी येशू ख्रिस्त

खरोखर वधस्तंभार मरण पावला, पूरला गेला आणि नंतर मृत्यू मधून जिवंत झाला! तो त्याच्या शिष्यांकडे परत गेल्यानंतर तो स्वर्गात परत गेला आणि आज तिथे आहे. तो स्वर्गात जिवंत आहे, आणि आपल्यातील प्रत्येकावर अजूनही प्रीती करतो. आपण त्याचा नकार केला तरी तो आपल्यावर प्रीती करतो. आणि होय तो नकार त्याला त्रास देतो, जसे नकार आपल्याला त्रास देतो तसे.


आपला मित्र विदूषक ह्याने त्याच भितीचा सामना केला. पूर्ण आठवडाभर तो सिंह प्रशिक्षक ह्याच्या सोबत नविन मित्र बनवू इच्छित होता. परंतू नकाराची भिती त्याला होती. त्याला मित्र हवा होता, परंतू मित्र करण्यासाठी त्याच्या मनामध्ये त्याला जोखीमची आवश्यकता होती. आज सकाळी नकाराची भिती दूर करून सिंह प्रशिक्षकाकडे जाऊन बोलण्यासाठी त्याला धैर्यवान होतांना पाहणे चांगले नव्हते काय? जरी कधी कधी आपण दुखावले जाऊ, तरी कधी कधी आपण जी प्रीती शोधत आहोत ती प्रीती आपल्याला सापडू शकते! तुम्ही नकाराच्या भितीची आणि एकटेपणाची जोखीम घेऊन ‘‘केवळ प्रीती’’ करू इच्छिता काय?

## पाठ करा

योहान 15:13"आपल्या मित्रांकरता आपला प्राण द्यावा ह्यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही."

## स्वत: करून पहा

*डाग (1 योहान 1:9)*



*साहित्य*

कोणत्याही रंगाचा मार्कर/पेन

*सादरीकरण*

मानवाच्या ह्दयाचे प्रतिक म्हणून स्वच्छ हात दाखवा. काळया मार्करने, जे पापाचे दर्शक आहे हातावर रेष काढा, असे दाखवित की ह्दय डागाळलेले आहे. तुमचा हात बंद करा, असे दाखवित की तो हात प्रार्थना करत आहे. जेव्हा तुम्ही हात उघडता तेव्हा ती रेष वधस्तंभ बनते.

*संदेश*

तुम्ही कोणतेही पाप केले तरी जर तुम्ही पश्चाताप करता आणि येशूला तुमच्या जीवनामध्ये येऊ देता तर, तो तुमची क्षमा करेल.

तसे कसे होते

जेव्हा तुम्ही तुमच्या तळ हातावर रेष काढता तेव्हा ती आडवी असली पाहिजे, तुमच्या हाताच्या पहिल्या घडिवर, जेणे करून तो बंद करतांना शाई उमटते व ग चे चिन्ह तयार करते ... वधस्तंभ. चित्र पहा.

## स्मृती चिन्ह

### *गुहा:*

साहित्य:




- गुहेचा नमुना
- कैची
- रंग किंवा रंगकांड्या
- एक हुक पक्के करणारे

सूचना:

चित्राला रंग द्या
दगड व गुहेचे चित्र असलेल्या पटटया कापा.
मदतीने, दाखविलेल्या दोन लहान छिद्रात टयाब टाका, गुहेच्या कापलेल्या आकाराला व दगडाला जोडत. गुहेवर दिलेल्या बिंदू रेषेवर.

आधी तयार केलेल्या गुहेवर कापलेल्या जागी पट्टया टाका.

विषयाच्या शेवटी नमूना कागद आहे.

## घरी

### *छोटे थिएटर*


त्यांनी सिरियलच्या डब्या पासून तयार केलेले थिएटर वापरण्याची मुलांना आठवण करून द्या हे लक्षात ठेवण्यासाठी की दिवसा काय शिकले.

त्यांना प्रोत्सिाहित करा की त्यांनी रविवार शाळेत जे शिकले ते आठविण्यासाठी ही कृती घरी आठवडयातून एकदा तरी करावी.

ही कृती त्यांचे संबंध मजबूत करण्यासोबत त्यांना स्वत:ला अधिक चांगल्या रितीने व्यक्त करण्यासाठी विकसित करेल.

## कलाबाजी

### *पटकन विचार करा*



*साहित्य*


10 हलक्या वस्तु जसे बॉल किंवा प्लास्टिकचे डबे


सूचना


संघांना 5 ते 10 च्या सदस्यांमध्ये विभागा
10 वस्तूंची सरळ रेष काढा (ह्या आधारे की संघात किती मुलं आहेत)
प्रथम दोन संघ वस्तूपासून एक पाऊल दूर पाठ करून बसतात.
शिक्षकांनी वेगवेळया सूचना द्याव्या. उदा: डोके आणि मुलांनी डोक्याला हात लावावा, गुडघे आणि मुलांनी त्यांच्या गुडघ्याला हात लावावा. जेव्हा शिक्षक म्हणावे पटकन विचार करा! मग मुलांनी त्यांच्या मागच्या वस्तू उचलाव्या.
तीन फे-यानंतर जो संघ सर्वात ज्यास्त वस्तू मिळवेल तो विजेता ठरेल.

*मोठ्या  मुलांसाठी सूचना अधिक क्लीष्ट असाव्या उदा. उभे रहा, एका पायावर उडी मारा, दोन पायावर बसा आणि नंतर पटकण विचार करा ही आज्ञा द्या!*

# विद्यार्थी पुस्तकं













जर उत्तर बरोबर असेल तर ह्या चित्राला गोल करा.
जर उत्तर चूक असेल तर ह्या चित्राचा उपयोग करा.

1. स्त्रीया संध्याकाळी कबरे कडे गेल्या.
2. त्यांना दिसले की कबरेवरील धोंड बाजूला केलेली आहे.
3. आत गेल्यावर त्यांना प्रभू येशूचे शरीर दिसले.
4. परंतू पेत्र कबरेकडे धावत गेला.
5. येशूचे शिष्य एकत्र जमले होते तेव्हा येशू त्याच्या सर्व शिष्यांना दिसला.





## प्रश्न व उत्तरं

**1.- देवाला तुम्ही दिलेले सर्वात मोठे प्रीतीचे प्रतीक काय आहे?**

प्रीती दाखविणे ही दर्शविण्यासठी सर्वात कठिण परिक्षा आहे, आणि देव जो प्रीतीचे जीवंत चित्रण आहे त्यासंबंधी दाखवायची असेल तर अधिकच. वास्तविक, जेव्हा आपण स्वत:ला नाकारतो आणि त्याला आपल्यासाठी चमकू देतो मग आपल्याला आपल्या स्वर्गातील पित्याकडून खूप हस्य किंवा स्मीथ प्राप्त होतात. हे आपल्या पाचारणाला शरण जाण्याद्वारे असू शकते, जे मंडळीत त्याची सेवा करणे आनंद घेणे किंवा त्याचे वचन सांगणे किंवा जे काही आपण त्याच्या नावाने करतो त्या संबंधी आवेशी असणे ह्या द्वारे असू शकते. आपण त्याच्यावर प्रीती करतो हे दाखविण्याचे हे महान मार्ग आहेत. स्तोत्र 27:4

**2.- एखाद्या व्यक्तिला तुम्ही प्रीतीचे सर्वात मोठे प्रतीक काय दिले?**

जे आपल्यावर प्रीती करतात त्यांच्यावर प्रीती करणे ही देवाने आपल्याला दिलेली मोठी क्षमता आहे, परंतू जे आपल्यावर प्रीती करत नाहीत ते सुध्दा आपण करावे अशी त्याची इच्छा आहे. हे अधिक कठिण आहे कारण अनेकदा जेव्हा कुटुंबातील व्यक्ति किंवा मित्र आपल्याला दुखावितो तेव्हा आपण क्षमा करण्यासाठी तयार नसतो. परंतू देव आपल्याला त्याची प्रीती दाखवितो म्हणून आपण सुध्दा ते इतरांना दाखवावे. ते कठिण असू शकते, परंतू देव आपल्याला त्याने जशी आपल्या चूकांच्या शिवाय आपल्यावर प्रीती केली तशी करण्यासाठी मदत करतो. 1 करिंथ 13:1-3


**3.- प्रीती दाखवित असतांना तुम्हाला कधी नकारले गेले काय? तुमची प्रतिक्रिया काय होती?**


ज्याला नको आहे आणि जो ती नकारून आपल्याला प्रतिक्रिया देतो त्याच्यावर तुम्ही कशी प्रीती करू शकता? जरी आपल्याला नकारले गेले तरी आपण प्रीती दाखविणे सुरू ठेवू शकतो. जर आपण त्या व्यक्तिला क्षमा केली, आपण आपले हृदय स्वच्छ केले तर आपण देवाबरोबर शांती प्राप्त करू शकतो. ज्यांनी आपल्याला नकारले किंवा जे त्याचे साक्षी आहेत आणि आपली प्रतिक्रिया हे देवाच्या प्रीती बद्दल अद्वितीय काही पाहू शकतात आणि त्यांचे हृदय कदाचीत त्याचा चांगला स्वीकार करण्यासाठी उघडू शकतात. 1 करिंथ 13:4-7, 13:13

नमुना कागद

# स्मृती चिन्हे





# अधिक कल्पना

जिथे तुमचा कार्यक्रम होणार आहे ती जागा सजविण्यासाठी आम्ही तुम्हाला काही कल्पना देऊ इच्छितो. आम्हाला माहित आहे की काही बारीक सारीक गोष्टी कधी कधी आपल्या हातून सुटतात, आणि काही अधिक कल्पना आपल्या हातात असणे हे नेहमीच चांगले असते. जेव्हा आम्ही तुम्ही आणि इतरांनी केलेल्या कार्यक्रमाचे अहवाल प्राप्त करतो आणि ते फोटो किंवा व्हीडिओ मध्ये पाहतो तेव्हा आम्हाला आनंद होतो. जर तुम्ही करू शकलात तर आमच्या ''मुले महत्वपूर्ण आहेत'' च्या फेसबुक पानावर ते वाटा. तो आमच्यासाठी आर्शीवाद असेल.

## मोठा विदूषक

निसंशयपणे, जेव्हा मुलं आणि मुली ह्या कार्यक्रमासाठी ह्या जागेवर येतात तेव्हा ह्या प्रसंगासाठी केलेली सजावट त्यांच्यावर सर्वात मोठा परिणाम करते. जे संसाधनं तुमच्या जवळ आहेत त्यांचा वापर करण्याचा प्रयत्न करा आणि जर तुम्ही काही सजावटी साठी पैसे गुंतवू शकतात तर ते करा जेणे करून ते इतर कार्यक्रमाच्या वेळी तुमच्या कामात येईल आणि उत्तम राहिल.

पहिला पर्याय आम्ही तुम्हाला देत आहोत तो आहे मोठा विदूषक बनविणे, पहिल्या दिवशी सर्वांचे स्वागत करण्यासाठी आणि जागेला आनंदी करण्यासाठी कारण आहे रंगीविरंगी विदूषक.

क्रेप किंवा त्याच्यासारखा कागद वापरा, कागदाच्या भरपूर पट्ट्या विदूषकाच्या पॅन्ट दाखविण्यासाठी लावा. कापडाचे तुकडे सुध्दा काम करतील.

हात जोडण्यासाठी काडीचा उपयोग करा जे डोक्याचे तळ बनवेल; विदूषकाचे बूटं, हात आणि तोंड रंगीत पुठ्ठयापासून तयार करा.

आम्ही सल्ला देतो की जी खोली ते वापरणार आहेत तिच्या प्रवेशात ते असावे किंवा मंचाच्या भिंतीवर, जेणे करून ते मध्येच येणार नाही. जर तुम्ही ते खोलीच्या मध्ये ठेवले तर ते मध्ये येईल.



## छताचे कापड

ही सजावट लक्ष वेधणारी आहे आणि खोलीचे वातावरण बदलते. छतावर लटकविण्यासाठी, सर्कसच्या तंबूचा भास आणणारे वेगवेगळे कापड शोधा.



## फलक

खेळण्याच्या जागी कार्यक्रम अधिक अनूकूल करण्यासाठी त्रिकोण झेंडे लावा. ते तयार करण्यासाठी रंगीत कागदाचे त्रिकोण कापा आणि कापड किंवा दोरीवर चिटकवा. ह्या मुळे वरील जागा भरपूर रंग आणि आकारांनी भरली जाते. पताके विविध आकाराचे असू शकतात जसे तुतारी, टोपी, टाय, चेंडू इ.



## फोटो मंडप/ बूथ

मुलांचे त्यांचे मित्र, शिक्षक आणि त्यांच्या आईवडीलांबरोबर फोटो किंवा सेल्फीसाठी फ्रेम असणे नेहमीच यशस्वी ठरते.

जर तुम्ही करू शकले तर, दोन फ्रेम तयार करा जेणे करून फोटो घेतांना प्रवाह चांगला ठेवता येईल. किंवा एक मुलांसाठी आणि एक मुलीसाठी तयार करा किंवा दोन वेगवेगळया बनावटीचे करा जेणे करून कार्यक्रमाच्या अधिक आठवणी त्यांच्याकडे राहतील.

जर तुम्ही तुमच्या कार्यक्रमाच्या वेगवेगळया आवश्यकतांसाठी स्थानकं बनविले तर चांगले आहे, एक स्थानकावर तुम्ही फोटोसाठी फ्रेम ठेवू शकता.






## टोप्या आणि गळयाचे टाय

सुशोभित रंगाचे टाय आणि टोप्या तयार करून भिंतीची सजावट साधी ठेवा. टोप्या अर्ध्या कापून भिंतीवर चिटकविल्या जाऊ शकतात.

टोप्या कापतांना दिलेला 3 डी परिणाम जागेला विशेष स्पर्श देईल. ते अशा जागेवर लावा जिथे लहान मुलं त्यांच्या पर्यंत पाहेचू शकणार नाही.

मुलांचे स्वागत करणे चांगले आहे, परंतू तुम्हाला भिंतीच्या सजावटीची गरज आहे. त्यांना भिंतीवर लटकविण्यासाठी त्या सारख्याच वस्तू आवडतील, म्हणून देण्यासाठी अधिक तयार करा.



## एक स्मीथ

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी मुलांचे व त्यांच्या आईवडीलांचे मोठया स्मीथने स्वागत करणे हया पेक्षा अधिक चांगले काय होवू शकते....

एका पुठ्ठयाच्या तुकडयावर विदूषकाचे मोठे स्मीथ काढा, त्याला काळया मार्करने गडद करा आणि इतर रंगांनी तपशील काढा.


त्याला पकडून ठेवण्यासाठी तुम्ही प्लास्टिक, लाकूड किंवा धातूचा उपयोग करू शकता, जशी आम्ही शिफारस केली तशी किंवा जे काही तुमच्या जवळ आहे ते.

आम्ही सल्ला देतो की स्वागताच्या वेळी तुम्ही ''अ पार्टी'' हया गीताच्या वेळेस हे स्मीथ वापरावे.

काही बक्षीसांसाठी, थोडे लहान स्मीथ तयार करा, मुलांना व मुलींना देण्यासाठी.



## आता तुम्ही करा




*सर्व नावाहून श्रेष्ठ नाव*
*फिलिप्पै 2:9-11*

*साहित्य*
गडद किंवा काळी पिश्वी, कागद, टेबल आणि मार्कर


*साधरीकरण*
ह्या हस्तकृतीने, तुम्ही कागदाचा आणि तुमच्या स्पर्श करण्याच्या संवेदनेचा वापर करून जे नाव सर्व नामाहून श्रेष्ठ आहे ते दाखविणार आहात.

*संदेश*
प्रत्येक नावाहून श्रेष्ठ नाव आहेः येशू ख्रिस्त ज्याने सर्व जगासाठी त्याचा जीव दिला.

*प्रकटीकरण*
सर्वांसमोर कोरा कागद दाखवा. तो कागद हाताने 9 तुकड्यात कापा. गटाला जगातील प्रभावी लोकांचे नावं विचारा, जीवंत किंवा मृत. त्यांचे नाव कागदाच्या प्रत्येक तुकड्यावर लिहा. येशू ख्रिस्ताच्या नावाचा समावेश करा, ते भागाच्या मध्य भागी ठेवा. तुकडे टेबलावर उलटे करा आणि एका स्वयंसेवकाला ते पिश्वीत टाकायला सांगा. तुमची पाठ फिरवा अशी की स्वयंसेवक काय करत आहे हे तुम्ही पाहू शकत नाही. आता पलटा आणि श्रेत्यांना सांगा की तुम्ही ते नाव काढणार आहात जे सर्व नावांहून श्रेष्ठ आहे. शोधणे अतिशय सोपे आहे, तो तुकडा शोधा ज्याच्या चारही बाजू फाडलेल्या आहेत. जेव्हा तुम्ही ते काढाल तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटेल.

## मदत करा!

विदूषकाला 5 जगलर दांडे वजन काटा संतूलित करण्यासाठी हलवायचे आहेत.




जे तुम्ही हलविले पाहिजे त्यांना गोल करा आणि नंतर तुमचे उत्तर लिहा.


## लहान कलाकार

मुलांच्या बौध्दिक विकासासाठी समजणे आणि आकलन हे दोन मूलभूत घटक आहेत. हे स्नायू आणि संवेदनेच्या कौशल्यांनी जोडले जातात जे मुलांला शिकण्यासाठी आणि त्याच वेळेस आनंद घेण्यासाठी कारणीभूत ठरतात. ह्या भागात मुलं त्यांची समज आणि आकलन कौशल्य कार्यरत करू शकतील. संघीक कार्याचे महत्व दाखविण्यासाठी ही संधी राहिल. सर्वात चांगला भाग हा आहे की ते मजेदार आहे.


कृतीत 5 मुलांचा संघ तयार करणे आहे. काय करावे ह्याच्या वेगवेगळया आज्ञा देणा-या शिक्षकांकडे त्यांनी लक्ष दिले पाहिजे.


शिक्षक एक अक्षर किंवा क्रमांक निवडतील आणि मुलांनी त्यांच्या संघासोबत ते तयार करण्यासाठी हलचाल करावी. उदा. जर शिक्षक म्हणतात, ''जे हे अक्षर'' तर मुलांना त्यांच्या संघासोबत ते तयार करावे लागेल.





जेव्हा मुलं काही अक्षर तयार करण्यात तरबेज होतात, तेव्हा ते पुढील पातळीवर जाऊ शकतात जे आई किंवा बाबा असे लहान शब्द तयार करणे आहे. ह्यासाठी दहा किंवा अधिक मुलांचा संघ तयार करा, जेणे करून सर्व भाग घेतील. अंकांसाठी दोन अंकी अंक तयार करा जसे 10. हे मुलांसाठी मजेदार राहील आणि त्याच वेळेस ते आकलन, समज आणि संघ म्हणून काम करणेही शिकतील.





# श्रेय

नेहमी प्रमाणे, सर्व तयार झालेल्या सामग्रीच्या मागे संपादक, सर्जनशील कर्मचारी, सन्माननीय सल्लागार आणि आमच्या संस्थापकांचा बिनशर्त पाठिंबा असतो. आम्ही हे पुष्ठ विश्वासातील बंधूचे आणि मित्रांचे मनापासून आभार मानन्यासाठी समर्पित करू इच्छितो ज्यांनी ह्या कार्यक्रमाच्या निर्मीतीसाठी मदत केली. 1 पेत्र 4:10

ह्या प्रकल्पासाठी दिलेला वेळ, प्रयत्न आणि निधीसाठी आपला देव तुम्हाला भरपूर बक्षिस देवो.

सर्वांचे आभार
Flor Boldo

संस्थापक, **Dwight and Kristina Krauss**
सर्जनशिल चमू पुढारी, **Flor Boldo**

सर्जनशिल चमू: **Jennifer Sánchez, Areli Salinas, Ramón Martínez, Marlon Hernández, Julio Sánchez, Mike and Vickie Kangas**

रचना : **Marlon José Hernández**

रचना सल्लागार : **Julio Sánchez and Suki Kangas**

फॅन पेज प्रशासक: **Ramón Martínez and Verónica Toj**

सल्लागार:

**Abner Chávez Molina**
**Music and lyrics**
**Song ID from the album I.D.**
**Instagram: tioabner**

**Elmer Estrada**
**elmeres02@gmail.com**
**Song arrangement: El Circo de la Vida**
**facebook/ElmerMomentos**

**Josué y Esther Hernández Hidalgo**
**- Jozhoo & Tsshe -**
**Songs "Encuentro con Dios" and "Tienes mi Control"**
**Instagram: jozhooytsshe**

**Linda Romero**
**Illustrations:**
**Lindy & Friends in collaboration with NosrettepArt**
**www.lindyandfriends.com**

**Paris Peña Sáchez**
**Author of "Una Fiesta"**

**Susy Danielle**
**Translator of "El Circo de la Vida"**
**facebook/Susy Danielle**

**Vector and image art:**
**www.freepik.com**